
दलितमित्र नानासाहेब टिपणीस ७५

८ डिसेंबर १९७३
पन्नास पैसे

# माणूस



संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

८ डिसेंबर १९७३

# माणूस

वर्ष : तेरावे । अंक : अठ्ठाविसावा

## सप्रेम नमस्कार....

३० नोव्हेंबर, ७३

■ ' माणूस 'च्या दि. १–१२–७३ च्या अंकातील ' वृक्ष एक : फळे दोन ' हे संपादकीय आवर्जून वाचले. एकाच सत्य-शोधक वृक्षाच्या दोन फळासंबंधीची आपली कारण मीमांसा परखड, बुद्धि-वादी वाटली. डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतराबद्दलच्या आपल्या मीमांसेबद्दल मतभेद होऊ शकतील. डॉ. चे धर्मांतर ही घटना सुयोग्य होती का चुकीची होती, का हिंदूधर्मीतील पिढ्यान्पिढ्या चालत आलेल्या भयानक विषमतेचा तो एक अपरिहार्य उद्रेक होता, हे मला वाटतं, काळच उत्तमरित्या ठरवील. कारण अनेक कूट समस्यांबद्दलचे काळाचे भाष्य हे अधिक बोलके असते. मानवांचे भाष्य केवळ तर्क नि अंदाजच ठरतात. तेव्हा डॉ. बद्दलचे निदान करण्याचे आपण कालप्रवाहावरच सोपवूया. एवढंच भाग्य समजू, की यवन धर्माला न कवटाळता डॉ. नी बुद्ध धर्म स्वीकारला. भारतभूमीला विषमतेचा शाप जसा आहे, तसे विवेकाचे नि समन्वयाचे वरदानही आहे नि या विवेकाचे प्रबोधनकार एक प्रतिक होते, हे आपले मत सत्य आहे. प्रश्न आहे की आपली उभी हयात समाजसुधारणेत घालविलेले थोरात्मे असूनसुद्धा आपण सुधारलो आहोत का ? एक म्हणता येईल, की समाजसुधारणेच्या नांदीचा पायरव ऐकू येऊ लागला आहे, इतकेच.

**चित्तरंजन घोटीकर**

माणूस साप्ताहिक, १०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी ' माणूस ' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

# हवाई टाळेबंदी

सु. ल. सोमण

दक्षिण मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातल्या कर्मचाऱ्यांचा संप मी पाहिला. एखाद्या संपाला सर्वसामान्य जनतेचा इतका भरघोस पाठींबा क्वचितच कुठे पहायला मिळावा.

मुंबईत काही महिन्यापूर्वीच झालेल्या डॉक्टरांच्या संपालाही जनतेची काही प्रमाणात सहानुभूती होतीच.

पेट्रोल दरवाढीनंतरच्या, अगदी परवाच्या टॅक्सी संपात टॅक्सीड्रायव्हर्सनी सामान्य लोकांना अक्षरशः अर्ध्या वाटेत उतरायला लावलं. लोक चिडले होते. टॅक्सीवाल्यांना अक्षरशः शिव्यांची लाखोली वहात होते. टॅक्सीवाल्यांची मस्ती जिरवण्यासाठी बृहन्मुंबईत ऑटोरिक्शा चालू कराव्यात असं तावातावानं आर्जवत होते. तरीही, पेट्रोलमधील एवढ्या मोठ्या भाववाढीनंतर टॅक्सीवाल्यांनी तरी काय करावं असा थोडासा सहानुभूतीदर्शक सूरही मधूनच लोक छेडीत होते.

साखरेची टंचाई होत असतानाही माथाडी कामगारांच्या मागण्यांना चारी बाजूंनी पाठिंबा जाहीर होत होता. वर उल्लेखिलेल्या प्रत्येक प्रकरणी निदान त्या त्या कर्मचाऱ्यांच्या लढ्यांची जाणीव तरी सामान्य जनतेत दिसून आली !

इंडियन एअरलाईन्सच्या चालू असलेल्या ताज्या टाळेबंदीबाबत, तिथल्या कर्मचाऱ्यांच्या लढ्यांबद्दल मात्र सामान्य जनतेत अशी जाणीव अजिबात नाही. ह्याचं प्रत्यंतर दोन-तीन दिवस हिंडत असताना मला पुनः पुनः आलं. अगदी सांताक्रूझ येथील हवाई कर्मचाऱ्यांच्या वस्तीबाहेर देखील ही जाणीव पार बोथट स्वरूपात असल्याचं मला जाणवलं. खुद्द हवाई कर्मचारी जिथे राहतात तिथली ही कथा, इतरत्र ह्या कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाला काय पाठिंबा असेल त्याची कल्पनाच केलेली बरी !

प्रसंग अगदी साधा आहे, पण बराच बोलका आहे. दादरच्या एका उपाहारगृहातून, इंडियन एअरलाईन्सचे विभागीय प्रमुख कॅ. सामंत ह्यांना मी फोन करीत होतो. काऊंटरवरचा कारवारी दुपारच्या वेळेत इतर फारसं गिऱ्हाईक नसल्यामुळे माझ्या बोलण्याकडे लक्ष

पृष्ठ ४१ वर

मॅजेस्टिक गप्पा

# दिवाळी अंक एक न वाचणे

चंद्रशेखर मराठे

गेल्या मे महिन्यापासून पुण्यातील लेखक, संपादक, प्रकाशक व लेखन विश्वाबद्दल आस्था असणारी मंडळी यांना एक नवेच व्यवधान मिळाले आहे. मॅजेस्टिक प्रकाशनच्या सौजन्याने चालणारा 'साहित्यिक गप्पा' कार्यक्रम हे ते व्यवधान. मे ७३ च्या पहिल्या पंधरवड्यात रोज सायंकाळी शनिवार पेठेतील मॅजेस्टिकच्या वास्तूत अनेक लेखक, प्रकाशक संपादक वगैरे मंडळी जमत. लेखन विश्वाशी संबंधित अशा विषयावर गप्पा करीत. त्या ऐकायला १०० च्या आसपास श्रोतेही असत. हा प्रकार संयोजक व सहभागी होणारे यांना एवढा आवडला की तो जरा निराळ्या स्वरुपात चालू ठेवावा असे ठरले. त्यानुसार दर महिन्याच्या पहिल्या रविवारी साहित्यिक गप्पांचा कार्यक्रम चालू असतो.

एखादा कार्यक्रम एखादे वेळी करणे सोपे पण तो नियमित चालू ठेवणे महाकठीण. शिवाय साहित्यक्षेत्रातील महाभाग नियमितपणाविषयी फारसे प्रसिद्ध नाहीत. मग साहित्यिक गप्पा चालू कशा राहिल्या ?

मला वाटते याचे इंगित 'गप्पा' या शब्दात आहे. व्यक्तिशः मला तरी मानवी प्राण्याच्या सर्व ॲक्टिव्हिटीमध्ये 'गप्पा ठोकणे' ही गोष्ट फार आवडते. 'गप्पा ठोकणे' हा माझा जवळजवळ मुख्य व्यवसाय फार पूर्वीपासून राहिला आहे. माझ्याप्रमाणेच अनेक लेखक, संपादक व प्रकाशक यांचेही 'गप्पा' या विषयावर मनस्वी प्रेम आहे याचा अनुभव आतापर्यंत नेहमीच आला आहे. गप्पाकडे कल असल्याखेरीज माणूस, लेखक, संपादक वा प्रकाशक होऊ शकत नाही असेही मला अनेकवार वाटले आहे.

मॅजेस्टिकच्या कोठावळयांनी या कार्यक्रमाचे नाव 'साहित्यिक गप्पा' असे ठेवून या कार्यक्रमाचे किमान यश व सातत्य निश्चित केले आहे. कोणतीही नवी गोष्ट वा ॲक्टिव्हिटी मंडळींना मूलतः स्वीकारणीय (ॲक्सेप्टेबल) वाटण्यासाठी तिचे नाव आकर्षक असावे लागते हाच अनुभव या गप्पांच्या यशावरून येतो.

डिसेंबर महिन्याच्या पहिल्या रविवारी जो गप्पांचा कार्यक्रम झाला त्याला मी गेलो होतो. गेला एक महिना महाराष्ट्राबाहेर असल्याने मला खूप मराठी मडळींना भेटण्याची अनिवार तलफ आली होतीच. शिवाय महाराष्ट्राबाहेर अमराठी शहरात लेखक म्हणून मला कोणीही न वागवल्याने माझ्यातील लेखक जरा अस्वस्थ झाला होता. साहि-

त्यिक गप्पाना जाणे हा एक मार्ग माझ्यातील लेखकाला पुन: भेटण्याच्या दृष्टीने मला आकर्षक वाटला.

मी गेलो ! प्राथमिक चहापाणी आटोपले होते व मंडळी गप्पा मारण्याच्या पवित्र्यात नुकतीच बसली होती. 'माझिया जातीचे मज भेटी कोणी 'ही माझी इच्छा पुरविण्याइतके साहित्यिक, संपादक व प्रकाशक तेथे अतिशय मोकळ्या अशा मनस्थितीत वर्तुळाकार बसले होते. विषय होता यंदाच्या दिवाळी अंकांचे स्वरूप व दिवाळी अंकांचे भवितव्य ' (गप्पासारख्या प्रसंगाला विषय जरा जड वाटतो ना ? मलाही वाटला. या बद्दल कोठावळ्यानी केलेला खुलासा असा–' मी दिवाळी अंकात काय वाचले ' हा विषय कोठावळ्यांनी सूचित केला होता. पण ही शब्दरचना जरा भोंगळ वाटल्याने या वेळच्या गप्पांचे सूत्रधार डॉ. भीमराव कुलकर्णी यांनी विषयाचे त्यांच्या भाषेत रिस्टेटमेंट केले.)

एकूण, दिवाळी अंकासंबंधी बोलायचे एवढे मंडळींना कुलकर्ण्यांच्या प्रास्ताविकानंतर कळले. पहिल्याने बोर्डावर घेतले गेले दिवाळी अंकातील वैचारिक साहित्य.

या मागचे गणित कळणे अवघड. कारण दिवळी अंकांचा मुख्य फोकस असतो ' ललितमधूर ' अशा गोष्टीवर. त्यामध्ये वैचारिक साहित्य येते ते केवळ 'साखरेबरोबर इकडे तांदूळ घ्यावे लागतील ' या न्यायाने ! कसेही असो. वैचारिक साहित्याबद्दल आपले विचार मांडले डॉ. प्र. न. जोशी यांनी.

त्यांनी (का कोण जाणे) तपशीलवार माहिती दिली ती डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांच्याच वैचारिक लेखाबद्दल. या वेळच्या वैचारिक साहित्याचा भर स्त्री दास्य विमोचनाच्या प्रश्नावर होता असे सांगून त्यांनी किर्लोस्करमधील लैंगिक स्वातंत्र्याच्या परिसंवादाचा जरा चिंताजनक अशा सुरात उल्लेख केला. या दिवाळींत संग्रही ठेवावा असा एकही वैचारिक लेख आढळला नाही असे सांगून जोशी यांनी समारोप केला.

जोशी यांच्याखेरीज दिवाळी अंकातील वैचारिक साहित्य उपस्थितांपैकी फारसे कोणी वाचलेले दिसले नाही. त्यांच्यानंतर वैचारिक साहित्यावर कोणीच काही बोलले नाही. (नंतर असे आढळून आले की उपस्थितांपैकी बहुतेकांनी मुदलात दिवाळी अंकच फार कमी वाचले होते. त्यावरूनच दिवाळी अंकांचे भवितव्य स्पष्ट होते ! )

नंतर मोर्चा वळला कथांकडे. डॉ भालचंद्र फडके यांनी ही गोलंदाजी केली. आकाशवाणीसाठी दिवाळी अंकातील सर्व कथा वाचण्याचे ' कंटाळवाणे ' काम मी केले असे सांगून त्यांनी काही विचार व्यक्त केले.

त्यांचे म्हणणे असे की गेल्या दोन तीन वर्षात मराठी कथा दुर्बोधतेच्या चाकोरीतून बाहेर पडली आहे. घटनाप्रधान बनत आहे. बहुतेक कथाकार अवतीभवतीच्या वातावरणातून कथाबीजे निवडतात, सामाजिकतेचे भान न ठेवता केवळ एकाएका व्यक्तिचीच

सुखदु:खे, भावविश्व तपाशीत बसतात. यामध्ये सुद्धा लैंगिक समस्यांचे ऑब्सेशन बऱ्याच प्रमाणात दिसून येते. व्यक्तीचे एकाकीपण हाही अनेक कथांचा मुख्य विषय दिसतो.

अशा मूल्यमापनानंतर फडके यांनी एक महत्त्वाचा विचार मांडला तो असा–पांढरपेशा–मध्यमवर्गीय लेखक आपल्या कथात व्यक्तिजीवनाचे तुटक चित्रण करतात. ते प्रभावहीन वाटते. या उलट दलित कथाकार आपल्या कथांमध्ये आपल्या संबंध समाजाच्या व्यथांचे चित्रण करण्याचा प्रयत्न करतात म्हणून या लेखकांच्या कथा अधिक प्रभावी वाटतात.

फडक्यांच्या जोडीला दिवाळी अंकामधील कथांवर बोलण्यास कोणीच पुढे आले नाही. मग सूत्रधार कुलकर्णी यांनी संपादकाचे, दिवाळी अंकाबद्दलचे विचार मांडण्यासाठी वाङ्मयशोभेचे श्री. म. म. केळकर व सोबतचे श्री. ग. वा. बेहेरे यांना पाचारण केले.

म. म. केळकर–मी गेली ३५ वर्षे वाङ्मय शोभा चालवीत आहे. दिवाळी अंक काढण्यात आता खास थ्रिल, उमेद अशी काही वाटत नाही. धंदा बरा होतो. दिवाळी अंकातील साहित्याची विशेषत: नवोदितांच्या प्रयत्नांची समीक्षक अजिबात दखल घेत नाहीत याचे वाईट वाटते.

ग. वा. बेहेरे–एकदोन नियोजनपूर्ण दिवाळी अंक सोडल्यास इतर साऱ्या अंकांच्या बाबतीत दिवाळी अंकाचा सगळा व्यवहार अप्रामाणिक झाला आहे. लेखकांकडून येईल ते आम्ही छापखान्यात पाठवतो. आम्ही साहित्य विकत नाही तर साहित्यिकांची नावे विकतो, त्यांच्यात हा व्यापार आहे. एक-दोन महिन्याच्या काळात नामवंत कथाकार २५–२५ गोष्टी कशा व कशासाठी लिहितात याचा शोध घेतल्यास दिवाळी अंकांचे भवितव्य अधिक सुस्पष्ट होईल. दिवाळी अंकाखेरीज इतर अंकांसाठी मोठे लेखक लिहितच नाहीत ही वाईट गोष्ट आहे.

संपादकांच्या या प्रांजल कैफियतींनंतर 'दिवाळी अंकातील कविता' हा नाजुक विषय प्रा. गं. ना. जोगळेकर यांनी हाताळला. ते म्हणतात, छंदोबद्ध काव्याकडे पुन: लक्ष वेधले असून त्या प्रकारच्या काव्यातून सूक्ष्म सौंदर्य स्पष्ट करण्याकडे जास्त कल दिसतो.

या साऱ्या चर्चेमध्ये सुमारे एक तास गेला. या चर्चेत स्त्रीलेखिका काहीच बोलल्या नाहीत. त्यांना बोलते करण्यासाठी सूत्रधार कुलकर्ण्यांनी स्त्रीलेखिकांच्या प्रश्नांचा उल्लेख केला.

त्यावर प्रतिक्रिया म्हणून सौ. शैलजा राजे बोलल्या, 'स्त्रीलेखिकांचे अनुभवविश्व मर्यादित असते हे खरे आहे. जरा परखड लिहिले की, समाजात व कुटुंबात थोडीफार वादळे उद्‌भवतात व ती स्त्री लेखिका सध्या तरी सहन करू शकत नाहीत. कथेतील सर्व प्रसंग, समस्या या लेखिकेच्या व्यक्तिगत आहेत असे मानण्याकडे अद्यापही कल दिसतो. खरे लिहिले तर लोकांना खोटे वाटते असाही अनुभव येतो. पुढच्या पिढीतील स्त्रिया

अधिक परखडपणे लिहितील व त्यामुळे उद्‌भवणाऱ्या वादळांना अधिक चांगल्या प्रकारे तोंड देतील.

सौ. ज्योत्स्ना देवधर यांनी कुँवरनी-विषयक त्यांचे कडु गोड अनुभव सांगितले. वादळी लिहायचे म्हणून मी कधीच तसे लिहीत नाही तर विषयाची गरज म्हणून लिहिते असे त्या म्हणाल्या. स्त्री मध्ये ह. मो. मराठे यांनी छापलेली माझी मुलाखत मला फार त्रासदायक ठरली अशी तक्रार त्यांनी केली. (इतका वेळ उपस्थित असलेले ह. मो. मराठे या तक्रारीच्या वेळी निघून गेलेले होते.)

बहुतेकांचे बोलणे संपले होते. 'स्त्री-लेखिकांनी पुरुष-लेखिका व्हावे' असा खेळकर संदेश देऊन सूत्रधार डॉ.भीमराव कुलकर्णी यांनी या गप्पा थांबवल्या.

मी साहित्यिक गप्पांबद्दल लिहीत असताना मध्ये मध्ये 'चर्चा' असा त्यांचा उल्लेख केला. मी नकळत माझी प्रतिक्रिया व्यक्त केली असे मला वाटते. या कार्यक्रमाचे अधिकृत नाव 'गप्पा' असे असले तरी प्रत्यक्षात या कार्यक्रमाला चर्चेचेच (किंबहुना छोट्या छोट्या लेक्चरेट्सचे) स्वरूप प्राप्त झाले आहे. हे बरोबर नव्हे.एक हाडाचा गप्पानिष्ठ म्हणून या कार्यक्रमाच्या स्वरुपाबद्दल मला चिंता वाटते.

याला संयोजक कोठावळे यांचा काहीच इलाज नाही. पण या कार्यक्रमात भाग घेणारांनी या गप्पाद्रोहाच्या प्रश्नाचा गंभीर विचार करून परत हा कार्यक्रम खऱ्याखुऱ्या गप्पांचाच होईल याकडे ध्यान दिले पाहिजे. कारण हा कार्यक्रम कोठावळे यांच्या सौजन्याने होत असला तरी त्याला खरा आधार गप्पाबहाद्दरांचाच आहे.

या वेळच्या गप्पा संपल्यावर चहा घेताना विज्ञानविश्व (की युग) या मासिकाचे संपादक श्री. गजाभाऊ क्षीरसागर मला म्हणाले, 'आम्ही प्रत्येक दिवाळी अंकात एकादा शास्त्रीय विषय घेऊन त्याला सगळा अंक वाहतो. त्याची दखल कोणीच घेत नाही. असे का ?'

मीही खरा ललितेतर लेखकच ! त्यामुळे त्यांचे दुःख मला जाणवले, समजले. त्यांना मी असा सल्ला दिला की, 'तुम्ही दिवाळी अक का काढता ? इतर एखाद्या वेळी असे विशेष शास्त्रीय विशेषांक काढा की.'

गजाभाऊ म्हणाले, 'दिवाळीच्या वेळी धंदा बरा होतो हो.'

आम्ही दोघे समदुःखी बरोबरच मॅजेस्टिक भवनच्या बाहेर पडलो.

● ● ●

# मुक्ताफळे

## □ व्यापारी का हसला ?

गेल्या मंगळवारी सकाळी अकरा वाजून एकवीस मिनिटांनी दिल्लीच्या विमानतळावर एक बडा व्यापारी विमानातून उतरला. दी मर्चंट ऑफ मॉस्को ! लिओनिद इल्यिच ब्रेझ्नेव. हे त्याचे संपूर्ण नाव देखील आम्ही व्यवस्थित लिहिले. कारण आम्ही 'सोविएट देश'चे वर्गणीदार आहोत. आपल्या देशात हे नियतकालिक ५००,००० हून अधिक खपते. नाहीतर आमची मराठी मासिके ! कागदच मिळत नाही, भाव वाढलेत अशा हजार बयादी सांगतील. 'सोविएट-देश' बघा म्हणावं. गुळगुळीत कागद. रंगीत चित्रे, शिवाय सगळ्या हसऱ्या माणसांची चित्रे. कुणी 'लेनिन पारितोषिक' घेत असो किंवा 'रात्रपाळीचे कामगार' घरी जात असोत. फोटोतले सगळे हसत असतात. नाहीतर आमचे फोटोग्राफर. मंत्र्याबरोबर नवपरिणीत वधु-वरांचे फोटो छापले, तरी काय ? मंत्री आले असूनही गळ्यात हार पण चेहरे ? चेहरे सुतकी ! का बरं ? जाऊ द्या. तर आम्ही मॉस्कोच्या व्यापाऱ्याचे संपूर्ण नाव नीट सांगू शकलो, याचे कारण 'सोविएत-देश !' अर्थात 'लिओनिद' म्हणजे काय ? 'इल्यिच' म्हणजे काय ? 'ब्रेझ्नेव' म्हणजे काय हे मात्र आम्हाला सांगता येणार नाही.

या व्यापाऱ्याबरोबर जो उपव्यापाऱ्यांचा तांडा आला ना, त्या प्रत्येकाला 'इंदिरा' म्हणजे काय ? 'प्रियदर्शनी' म्हणजे काय ? असे विचारले असते तर त्यांनी ताडकन सांगितले असते. इंदिरा म्हणजे लक्ष्मी ! इंदिरा म्हणजे लोकमाता ! प्रियदर्शिनी म्हणजे ब्युटिफुल टु बिहोऽऽ ! कारण दिल्लीतील रशियन वकिलातीने ब्रेझ्नेव येण्यापूर्वी दिल्लीतून ही सगळी माहिती गोळा केली. मॉस्कोला पाठवली. येणाऱ्या सगळ्यांनी पाठ केली ! कॉमरेड अरूणा असफअल्ली, पेट्रोल मंत्री देवकांत बरूआ यांनी 'अमरकोश' चाळून ही माहिती पुरवली म्हणे. पुरवली हे चांगलं केलं. परंतु त्यांना काही असे वाटले नाही, की आपणही त्या मंडळींना विचारावे, बाबांनो 'लिओनिद' म्हणजे काय ? 'इल्यिच' म्हणजे काय ? यामुळे या सुंदर नावाचे अर्थ समजायला आम्ही पारखे झालो ना. माणसांच्या नावाभोवती कसला आलाय आयर्न कर्टन !

तर हा व्यापारी विमानातून उतरल्याबरोबर जो हसायला लागला तो तब्बल पाऊण तास हसत होता ! सकाळी अकराची वेळ. दिवस सुटीचा नाही. काम धंदे सोडून आणि शाळा-कॉलेजांना दांडी मारून पंधरा-वीस हजार लोक चार-पाच तास विमानतळा-वर माशा मारीत बसतात, हे पाहून व्यापाऱ्याला पहिले हसू आले.त्याने अर्थात बरोबरच्या माणसांकडे चौकशी केली. 'हे कसे काय बुवा ?' रशियन वकिलातीतील माणसाने सांगितले–

'ही माणसे कुणाच्याही स्वागता-साठी अशीच जमतात. इराणचा राजा येवो, नेपाळचा राजा येवो, आठवड्या-पूर्वी मॉस्कोला गेलेले अध्यक्ष गिरी परत येवोत, इंग्लंडची राणी येवो, केनेडी येवो. कोण येतो हा इथे प्रश्न नाही. कामधंदा नसलेले लोक अमाप आहेत. कामधंदा असून तो सोडून येणारे त्याहून अधिक आहेत. चार-पाच तास मजेत जातात. तेव्हा हा तमाशा इथे नेहमीचाच चालतो. आज जरा गर्दी जास्त दिसते आहे, कारण आपल्या कॉमरेड डांग्यांनी खटपट करून जरा जास्त माणसे जमविलेली दिसताहेत, इतकेच....'

हे ऐकून व्यापारी तर खो खो हसू लागला. तसा तो जग फिरलेला माणूस. जगाची बाजारपेठ अमेरिका-रशिया यांनी वाटून घेण्याचा डाव छान रंगला होता. दोघांचे हाडवैर असल्याचे एक नाटक सुरू झाले. जगातले काही देश म्हणायचे आम्ही या गटाचे. दुसरे म्हणायचे आम्ही त्या गटाचे. दोन्ही गटांचा म्होरक्या व्यापार उत्तम करी. पंडितजी म्हणायचे, आमचा गट – नॉन अलाइन्ड ! म्हणजे प्रत्यक्षात रशियाशी अलाईन्ड आणि दुष्काळ पडला की अमेरिकेशी देखिल अलाईन्ड. परंतु चीनने घोटाळा सुरू केला. त्याने 'अणू-बॉंब' तयार केला. जगाला बजावले– 'आम्ही आता बडा देश आहोत. रशिया अमेरिकेने जगातल्या आमच्या वाटचाला हात लावू नये...' सगळी धांदल उडाली.

२५ जून १९७३ रोजी लिओनिद ब्रेझ्नेव वॉशिंग्टनला गेले. अमेरिकेचा बडा व्यापारी जो निक्सनसाहेब त्या निक्सनसाहेबाने त्यांचे स्वागत केले. सात दिवस दोघांची खलबते झाली. दुसऱ्या महायुद्धानंतर पंचवीस वर्षे चालवलेले शत्रुत्वाचे नाटक बंद कर-ण्याचा निर्णय घेण्यात आला. अमेरिकन बँकांच्या शाखा रशियात सुरू कराव्या, अमेरिकेने रशियाला गहू द्यावा, अमे-रिकेने सैबेरियात तेलाच्या खाणी खोदाव्या. अंतराळ संशोधन एकत्रित करावे. असे नाना समझोते झाले. निक्सन साहेबही व्हिएतनामी युद्धाने जेरीस आला होता. आर्थिक क्षेत्रात जपानने त्याला धडकी भरवली होतीच. दोन्ही व्यापाऱ्यांनी करार केला. निक्सन-साहेबाने माओशी मैत्री जोडावी. रशि-याने भारताला पंखाखाली घ्यावे. आता युद्ध नाही ! सहकार. विनासहकार नही उद्धार !

मॉस्कोला चीनपासून अभय हवे होते. अमेरिकेने चीनला प्रेमाच्या दबावात

ठेवले तर चांगलेच. नाही तर चीनला दक्षिणेकडून घेरण्याकरता भारताची बंदरे हवीत! एकाएकी मॉस्कोला 'एशियन सेक्युरिटी'चे नगारे वाजू लागले. कुणापासून सेक्युरिटी? काय 'मलेशिया' चालून येणार आहे की 'व्हिएतनाम' भारतावर बाँब टाकणार आहे? परंतु मॉस्कोवारी होते आहे. मंडळी निघाली. काँग्रेस आणि कम्युनिस्ट भाईंना घेऊन इंदिरा काँग्रेसचे जनरल सेक्रेटरी ऑक्टोबरात मॉस्कोला गेले. किती गेले. दोनशे दहा माणसे गेली. त्यात ४५ खासदार होते. सगळे नवे राजकीय 'हिप्पी' मॉस्को मेळाव्याला हजर राहिले,

मेळावा सुरू झाला कोसिजिन आले. ब्रेझ्नेव आले. पाहतात तो भारतातील २१० माणसे थरथर कापत आहेत. त्यानी विचारले–' कसली भीती वाटते?'

सगळे अडखळत सांगू लागले–

दक्षिण-पूर्व आशियात नरराक्षस माजत चालले आहेत. आम्हाला सेक्युरिटी हवी! एशियन सेक्युरिटी...'

रशियन व्यापारी हसत–म्हणाला–

'असं काय वरं करता. आधी नीट उभे रहा पहू आधी! तुमचे ३०% पोलाद आम्ही निर्माण करतो. २०% वीज आम्ही निर्माण करतो. ३५% तेलोत्पादन आम्ही करतो. ८५ टक्के हेवी इलेक्ट्रीकल्स करतो. ५७० मिलियन पौंड कर्ज आतापर्यंत दिलेले आहे. 'मिग २१' विमाने दिली. कारखाना काढून दिला. आता 'मिग २३', 'सुकोई २०' ही ही नवी विमाने हवी असली तर देऊ. परवा इराकमध्ये प्रथमच अरबानीही वापरली. छान चालतात. आम्ही 'एशियन सिक्युरिटी योजना' आखतो आहोत. तुम्ही निर्धास्त रहा. प्रांतोप्रांती इंदिराजींची मंत्रिमंडळे चालू रहातील एवढीच काळजी तुम्ही घ्यायची. इस्टेटी करा. पैसे करा. संरक्षणाचे आमच्यावर सोपवा हे सगळं...'

सगळे हिप्पी एकदम नाचू लागले एकाने विचारले–'मग कधी येत आमच्याकडे...'

ब्रेझ्नेवने सांगितले–

'पुढच्या महिन्यात...'

परवा विमानतळावर व्यापारी उतरला तो हे खासदाराचे प्रफुल्ल चेहरे स्वागताला तिष्ठत होते. त्यांना पाहून व्यापाऱ्याला हसू आले. चेहरे इतके आशाळभूत वर्षानुवर्षे कसे काय राहू शकतात याचे त्याला हसू येत होते.

ब्रेझनेव्ह म्हणजे रशियातील एका


**पूर्णिया**

**अनिल अवचट**

**सहा रुपये**

**राजहंस प्रकाशन**

पक्षाचा जनरल सेक्रेटरी ! उद्या इंग्लंडमधल्या कॉन्झरव्हेटीव्ह पक्षाचा अथवा मजूर पक्षाचा सेक्रेटरी आला तर होईल असे सरकारी स्वागत ? ब्रेझ्नेवनी भारतातील त्यांच्या पक्षाच्या पुढाऱ्याशी वाटाघाटी केल्या. भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या ' नॅशनल कौन्सिल ' पुढे त्यांचे भाषण झाले. कॉमरेड डांगे, राजेश्वरराव, इंद्रजित गुप्ता सगळे हजर होते. त्यानी डांग्याच्या पक्षाला कार्यक्रम सांगितला. ' काँग्रेसमधले कम्युनिस्ट आणि सी. पी. आय् कम्युनिस्ट यातले अंतर कमी करा. दुसरी गोष्ट. आम्हीही हस्तक्षेप करतो. अमेरिकाही हस्तक्षेप करते. आम्ही तूर्त संगनमताने युद्ध सुरू करतो, बंद करतो. परंतु आमचा हस्तक्षेप हा ' समाजवादी ' आहे असा सारखा शंख करायचा. अमेरिका साम्राज्यवादी आहे असा बेंडबाजा सारखा वाजवायचा. हे वाजंत्र्याचे काम तुम्ही चोख केले पाहिजे. अधिक सूचना तुम्ही अधून मधून आजारी पडून मॉस्कोला उपचारासाठी याल तेव्हा दिल्या जातील...'

कॉमरेड डांगे म्हणाले—

' बरेच दिवस मला बरे नाही. चेक अप् साठी पुढील महिन्यातच येईन म्हणतो...'

व्यापारी हसला, म्हणाला—

' इंदिराजीना आम्ही निमंत्रण जाताना देऊच ! त्यापूर्वी तुम्हाला यावेच लागेल एकदा...'

व्यापारी येताना हसत होता तसा जातानाही हसत होता !

—ग्यानबा

# अजब न्याय वर्तुळाचा एक टिपण

अजब न्याय वर्तुळाचा हे नाटक मी जेव्हा साहित्य संघ मंदिरात पाहिले तेव्हा मला ते अनेक दृष्टीने महत्त्वाचे वाटले. हे नाटक मूळ जर्मन भाषेतले. बर्टोल्ट ब्रेख्तने ते ' कॉकेशियन चॉक सर्कल ' या नावाने लिहिले. ' अजब न्याय...' हे त्याचेच मराठी रूप. रंगभूमीबाबतच्या ब्रेख्तीय कल्पना मराठी प्रेक्षकाला तशा नवीनच आणि त्यामागची वैचारिक पार्श्वभूमी तर अगदीच अनोळखी. त्यामुळे ' प्रेक्षक आणि नाट्यवस्तू यांच्यात सतत दुरावा जाणवत राहिला पाहिजे ' हे आपल्यासारख्याना विचित्रच वाटेल. एखादे आवेशपूर्ण वाक्य झाल्यावर भावनेने बेहोश होऊन आपण टाळ्या वाजवणार. ब्रेख्त या विरुद्ध सतत इशारा देतो. प्रत्येकवेळी तो आपल्याला कोडी घालतो; विचारशक्तीला आवाहन करतो. कुठल्याही नशेत बुडू देत नाही. विचार सतत जागृत करण्याचा प्रयत्न करतो आणि म्हणून आपल्यासमोर जे चालले आहे ते नाटक आहे, आभास आहे हे दर्शवण्याचा त्याचा हेतू असतो. म्हणूनच ही दुराव्याची (किंवा ज्याला परात्मभाव असे म्हटले जाते) कल्पना. ही कल्पना. मूर्तस्वरूपात येण्यासाठी बऱ्याच युक्त्याप्रयुक्त्या योजल्या जातात. त्यासाठी पात्रानी स्वतःच रंगमंचावर वस्तू

हलवाहलव करणे; नावाचे फलक लावणे; गाणी गाणारे रंगमंचावर उभे राहणे; (रूढ अर्थाने) सेटस् नसणे असे अनेक उपाय असतात. अर्थातच अशा प्रकारच्या नाटकाना परंपरागत फॉर्म्स अधिक योग्य ठरतात. लावणी, गोंधळ, दशावतार, पोवाडे या सर्वासाठी अशा नाटकात भरपूर वाव असतो. 'अजब न्याय...' मध्ये यांचा वापर केला आहे.

ब्रेख्तीय रंगभूमी ही तसं पाहिलं तर प्रस्थापित रंगभूमीवर विरुद्धचं बंड आहे; पण इतर आक्रस्ताळी आणि सर्वच नाकारणाऱ्या रंगभूमीवरच्या बंडखोरांपेक्षा तिची जात वेगळी आहे. ती जगाकडे हताशपणे पहात तिच्यावर शेरे मारीत नाही; तर आपल्यासमोर जे जग आहे ते बदलण्याचा प्रश्न महत्त्वाचा मानते. त्यामुळे ब्रेख्तीय नाटकात कथावस्तूला महत्त्व असतं पण ते त्या घटनांच्या मालिकेच्या तपासाच्या संदर्भात. प्रत्येक गोष्ट तपासून पाहणे हे तिचं वैशिष्ट्य मानता येईल. समाजातली आजची परिस्थिती अशी आहे की आपण प्रत्येक प्रश्नात खोल बुडी मारण्याऐवजी ते बाजूला सारण्याचा प्रयत्न करतो; त्यांच्याकडे डोळेझाक करण्याचा प्रयत्न करतो आणि आपल्या डोळ्यासमोर येणारं जे आहे ते एकतर मुकाट्याने सहन करतो किंवा त्याला क्षणिक प्रतिक्रिया दाखवतो. सामाजिक प्रक्रियांकडे दुर्लक्ष करणाऱ्या आणि त्यांची ऐतिहासिकता न जागणाऱ्या माणसाची ही शोकांतिका आहे आणि ब्रेख्तचे रंगभूमीविषयक प्रयोग हा त्यावरचा उतारा आहे.

ब्रेख्तच्या रंगभूमीविषयक कल्पनांच्यामध्ये भावनेला महत्त्व नाही असा याचा अर्थ नव्हे. उलट ब्रेख्त असं मानतो की भावना आणि बुद्धी यांची फारकत होऊन दोहोंचाही जो ऱ्हास— आज सुरू आहे त्यावर आपल्याला हल्ला चढवायचा आहे. भांडवलशाही समाजरचनेच्या ऐतिहासिक प्रक्रियेत या दोहोंचीही जी सतत घसरगुंडी चालू आहे त्यात जर आपल्याला भावनेला उच्चपदी बसवायचं असेल तर (तपासाचं) बौद्धिक काम केल्याशिवाय गत्यंतर नाही. 'गुड वुमन ऑफ सेत्झुआन' या नाटकात ही क्रिया अधिक स्पष्टतेने दिसून येते.

गेल्या वर्षभरात ब्रेख्तची दोन नाटकं मराठी प्रायोगिक रंगभूमीने सादर केली. विजया मेहतानी अत्यंत परिश्रमपूर्वक ती बसवली. ज्या तयारीने ही नाटकं सादर केली गेली (विशेषत: 'अजब न्याय वर्तुळाचा') ती तयारी अभिनंदनीय आहे. मराठी नाटकाच्या इतिहासातला एक महत्त्वाचा टप्पा म्हणण्याइतकी अभिनंदनीय. पण ब्रेख्तसारख्या नाटककाराने जे आव्हान प्रायोगिक रंगभूमीला दिलं आहे ते स्वीकारण्याची आपली तयारी आहे का? ब्रेख्तच्या नाट्यसंहितेमागची वैचारिक रचना (आयडिऑलॉजिकल स्ट्रक्चर) आपण आकलन करून घेणार का? किंवा रंगभूमीची बाह्य आणि अंतर्गत (म्हणजे वैचारिक व भावनात्मक) रचना आपण ती अधिक लोकाभिमुख करण्यासाठी वापरणार का? की अधिकाधिक प्रयोग करीत करी दुर्बोधतेच्या टोकाला जाणार? ह्या प्रश्नांची उत्तरे अर्थातच प्रचलित रंगभूमीत सापडणार नाहीत. त्यासाठी खूप मोठ्या आणि वेगळ्या तऱ्हेच्या प्रयोगशीलतेची गरज आहे आणि त्यावर रंगभूमीचा विकास अवलंबून आहे असं मी मानतो.

—अशोक राजवाडे

विधानसभेतल्या प्रश्नोत्तरांवर आधारित–

# अजब तुझे सरकार !

## कामगारांचा प्रॉव्हिडंड फंड आणि न्यायालय !

सु. ल. सोमण

प्रश्न क्र. १६३३९ दि. १६-८-१९७३

**प्रश्न आ. श्रीमती मृणाल गोरे, मालाड मुंबई**

तारांकित प्रश्न क्रमांक ८२११ ला दि. २३–२–७३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय कामगार मंत्री पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय–

बार्शी येथील जयशंकर गिरणीतील कामगारांचा भविष्य निर्वाह निधी प्रॉव्हिडंट फंड कमिशनरकडे जमा न केल्याबद्दल गिरणीचे मॅनेजिंग डायरेक्टर व इतर यांच्यावर बार्शी व माढा येथील कोर्टात जे खटले भरले आहेत त्याबाबतची थोडक्यात प्रगती काय आहे ?

**उत्तर : कामगार मंत्री श्री. तिडके**

बार्शी व माढा या दोन ठिकाणच्या खटल्यांच्या सुनावणींना हजर रहाणे कठीण होते. म्हणून त्या दोन्ही ठिकाणचे खटले ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट, फर्स्ट क्लास कोर्ट, सोलापूर ह्यांचे पुढे सुनावणीसाठी पाठवावेत असे अर्ज (क्रमांक ७३–७२ व क्रमांक ७९–७२) दि. १५ ऑक्टोबर १९७२ व १४ नोव्हेंबर १९७२ रोजी गिरणीच्या चालकांकडून सत्र न्यायाधीश, सोलापूर यांजकडे केले आहेत. या दोन्ही अर्जांबाबत अजून अंतिम निर्णय झालेला नाही; आणि तो झाल्यावर बार्शी व माढा येथील खटल्यांच्या बाबतीत प्रगती संभवनीय आहे. वरील अर्जांची सुनावणी दिनांक १६-११-७२, २२-१-७३, २६-२-७३ व ३–५–७३ रोजी झाली. दिनांक १६–६–७३ रोजी त्या वेळचे सत्र न्यायाधीश (श्री. लठ्ठे) कालवश झाले. नवीन सत्र न्यायाधीशांची अजून नेमणूक व्हावयाची आहे. तशी नेमणूक झाल्यानंतर पुढील सुनावणीचा दिनांक मिळू शकेल.

मृणाल ताई, धन्य आहे हं तुमची, एवढ्या आमदार बाई झालात, लाटणे मोर्च्यांनी मुंबई, नागपूर गाजवलंत, आणि तरीही तुम्हाला आपल्याकडच्या न्यायदानाची पुरेशी माहिती नाही म्हणजेच आश्चर्यच नाही का ! एरवी एवढ्या तडकाफडकी, कोर्टात अडकलेल्या कामगारांच्या खटल्याच्या प्रग-

तिची चौकशी तुम्ही केलीच नसतीत. किमान चार-पाच वर्ष तरी नक्कीच थांबला असतात !

एक न्यायाधीश कालवश झाल्यानंतर दोन अडीच महिने नवे न्यायाधीश मिळत नाहीत म्हणजे न्यायाधीशांची बरीच चणचण असावी. न्यायाधीशांचे अपुरे पगारच ह्या चणचणीला बहुतेक कारणीभूत असावेत. केंद्रीय कायदामंत्री हरिभाऊ गोखल्यांनी पाच-सात वर्षांपूर्वी हेच सांगून राजिनामा दिला होता ते खरंच होतं म्हणायचं ! ◻

## मुंबईतले फेरीवाले

प्रश्न क्र. १५३०१ दि. १३-८-१९७३

प्रश्न : आ. श्री. द. नातू (गुहागर)

आ. श्री. प्रमोद नवलकर (गिरगाव) मुंबई

सन्माननीय नगरविकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय—

१. मुंबईतील फेरीवाल्यांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न म्हणून महापालिकेच्या व शासनाच्या प्रतिनिधींची बोलणी १९७२ साली किती वेळा झाली ?

२. वरील चर्चेमधून कोणते निर्णय घेण्यात आले ?

३. शासनाकडून महापालिकेला फेरीवाल्यांचा प्रश्न सोडविण्यासाठी मदत केली जाणार आहे हे खरे काय, च असल्यास कोणत्या स्वरुपात ?

**उत्तर : नगर विकास मंत्री डॉक्टर रफीक झकेरिया.**

१. दोनदा.

२. या सभांमध्ये कोणतेही निर्णय घेण्यात आले नाहीत. परंतु या सभांमध्ये वेगवेगळ्या वक्त्यांनी केलेल्या सूचनांचा विचार महापालिकेने करावयाचा आहे.

३. शासनाचा संबंध फक्त उपलब्धतेप्रमाणे शासनाच्या मालकीची जमीन देणे अथवा खाजगी मालकीची जमीन संपादित करून देणे आणि महापालिकेने शासनाकडे पाठविलेल्या अडचणी निवारण करण्यास मदत करणे एवढ्याच पुरता मर्यादित आहे आणि महापालिकेला याबाबत सहाय्य करण्याचे शासनाचे धोरण आहे.

—महापालिकेला असे प्रश्न विचारले असते तर बहुधा पुढील उत्तरं मिळाली असती :—

१. दोनदा.

२. सभा विचारविनिमयांसाठीच फक्त होत्या. तेव्हा निर्णयांचा संबंध येतच नाही.

३. विचारविनिमयांच्या आधारे ह्या प्रश्नांसाठी शासनाचं सहाय्य अपेक्षित आहे. महापालिकेचं शासनाशी सहकार्य करण्याचं धोरण आहे.

—शासन व महापालिका यांच्या झोंबटात प्रश्न निश्चित कुठे घुसमटतो आहे त्याची चाहूल फेरीवाल्यांनी ' फेरी 'च्या वेळी अवश्य घ्यावी !

प्रश्न क्रमांक १७५६९.

दिनांक २०-८-१९७३

प्रश्न : आ. श्री. केशवराव राणे, कणकवली

**आ. श्री. अ. तु. पाटील, पेण**

सन्माननीय समाजकल्याण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय–

१. मुंबई शहरात सध्या भिकाऱ्यांची संख्या अंदाजे किती आहे ?

२. मुंबईतील मोठमोठ्या हॉटेल-समोर तसेच अन्य सार्वजनिक ठिकाणी व शहरातील ट्रॅफिक सिग्नलजवळ हे भिकारी ठाण मांडून असतात आणि येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना व विशेषत: परदेशी प्रवाशांना त्रास देतात, हे शासनाच्या निदर्शनास आले आहे काय ?

३. असल्यास, शासनाने त्याबाबत काय कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे ?

**उत्तर : समाजकल्याण मंत्री श्रीमती प्रतिभा पाटील, पेण**

१. अंदाजे २५,०००.

२. होय.

३. याबाबत मुंबई भिक्षा प्रतिबंधक कायद्यानुसार जानेवारी १९५३ पासून आजतागायत मोठ्या हॉटेलसमोर आढळलेले ८१८, ट्रॅफिक सिग्नलसमोर आढळलेले ८१७ व इतर सार्वजनिक ठिकाणी आढळलेले १११६ भिकारी पकडण्यात आले व त्यांच्याविरुद्ध योग्य ती कायदेशीर कारवाई चालू आहे.

–ह्या २५,००० मध्ये हिप्पींचा समावेश बहुधा नसावा. त्यांच्यामुळे एतद्देशीय नागरिकांना होणाऱ्या त्रासाचाही तपशील गोळा करून आमदारद्वयांनी प्रश्न विचारायला हरकत नाही.

–ह्या भिक्षा प्रतिबंधक कायद्यानुसार दर पाच वर्षांनी (हल्ली केव्हाही मधून-मधून !) मतांचा जोगवा मागणाऱ्यांनी दिलेली आश्वासनं पाळली नाहीत तर त्यांच्याविरुद्ध काही तरतूद आहे काहो मंत्रीमहाशय ? जरा प्लीज सांगाल का?

–मुंबईतली भिकाऱ्यांची संख्या अंदाजे ७५००० आहे.

–डॉ. एस्. डी. गोखले, सेक्रेटरी, इंडियन कौन्सिल of Social Wale-fare. (टाईम्स, २५ १९७३)

उत्तर काय–कप्पाळ ?

प्रश्न क्रमांक १४२०७

दिनांक ३–८–१९७३

**प्रश्न : आ. श्रीमती मृणाल गोरे, मालाड, मुंबई**

सन्माननीय सहकार मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :

१. लातूर को-ऑपरेटिव्ह ऑईल इंडस्ट्रीज या संस्थेस १२० टन मटन टॅलोचा कोटा मंजूर झाला होता, त्याचा अपहार झाल्याचे उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय ?

२. असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय ?

३. असल्यास त्यात काय आढळून आले व त्यानुसार पुढे काय कारवाई करण्यात आली ?

**उत्तर : सहकार मंत्री श्री. यशवंत-राव मोहिते**

**उत्तर : आले नाही.**

–मौनं सर्वार्थ साधनम् ???

● ● ●

# मोलकरी

## मोटार चालवणारे पाणी

पेट्रोलचा वास मला आवडतो. तुमच्या नाकपुड्यांना चुचकारणारे, गुदगुल्या करणारे, चेतवणारे सुवास मलाही आवडतातच; पण कांहींना नाक दुमडायला लावणारे मोजके दुर्वासमुद्धा मला आवडतात : स्पिरिट-घासलेटचा वास मला आवडतो; आयोडिन–टर्पो-टाईनचा वास मला आवडतो; फिनाईल आणि झुरळाच्या गोळ्यांचा वास मला आवडतो. ही यादी आणखी लांबवून माझ्या नाकाची शेलकी रसिकता जाहीर करीत बसत नाही मी. लक्षात एवढेच घ्यायचे की मला पेट्रोलचा वास आवडतो.

सुदैवाने वास आवडण्याइतपतच पेट्रोलशी माझा संबंध येतो. पेट्रोलवर चालणारा सिगारेट-लायटर किंवा मोटार घेणे मला अजून जमलेले नाही. आणि दिवस तर असे कठीण आले आहेत की ते (म्हणजे सि. ला. किंवा मो. हो) घेणे कधीकाळी जमेल असेही वाटत नाही. सध्या मोटारवाल्यांची काय धमाल धांदल झाली आहे. पेट्रोलचे भाव भडकले आहेत नी मोटारवाल्याची माथी भडकली आहेत. त्यांचे जीवन तुमच्यामाझ्यासारखे खुरडायला–सरपटायला लागले आहे. समतेचा अपूर्व साक्षात्कार झाल्याने तुम्हीआम्ही अंतर्यामी थोडेसे सुखावलो आहोत.

पण मोटारवाले फार काळ पादचारी राहू शकत नाहीत, असा माझा एक सिद्धान्त आहे. म्हणजे असे की काही काळानंतर त्यांच्या दोन पायांचीच चार चाके होतात. पेट्रोल त्यांना पाण्यासारखे उपलब्ध होते. हे मी अतिशयोक्तीने लिहिले ही गोष्ट खरी; पण ती वास्तवोक्ती वा उनोक्ती ठरावी अशी नामी परिस्थिती निर्माण झाली आहे.


विश्वास बसत नसेल तर पुण्याच्या असोसिएशन ऑफ स्टेट रोड ट्रॅन्स्पोर्ट अंडरटेकिंगच्या 'स्टेट ट्रॅन्स्पोर्ट न्यूज' या मुखपत्रातील बातमी वाचा. या बातमीप्रमाणे इटालीच्या एन्रिको इग्नेस्टी नावाच्या पावरबाज माणसाने पाण्यावर (म्हणजे पाण्याच्या पृष्ठभागावर नव्हे तर पेट्रोलऐवजी शुद्ध पाणी वापरून) मोटार चालविण्याचे एक उपकरण शोधून काढले आहे. इग्नेस्टीच्या उपकरणाने पाण्यातील ऑक्सिजन व हायड्रोजन हे घटक वेगळे होतात आणि त्यातल्या हायड्रोजनमध्ये मोटार गतिमान करायची अद्‌भुत शक्ती येते. या उपकरणाची किंमत अवघी सातशे रुपये आहे!

तुम्ही शंका काढालच (तुम्हाला काय आम्ही ओळखीत नाही?) की इग्नेस्टीच्या उपकरणाला काही खास प्रक्रिया केलेले पाणी लागत असेल. तर तसे बिलकुल नाही. साधे नळाचे पाणी चालते; मोटारला चालवते.

आता मला (सिगारेट-लायटर आणि) मोटार घ्यायला हरकत नाही. त्याआधी नळाला पाणी येण्याचे उपकरण घेतले की झाले.

असे उपकरण कोठे हो मिळते?

—अनंतराव



बिवलकर नानासाहेब रामटेके

# दलितमित्र नानासाहेब टिपणीस यांच्या ७५ व्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त खास मुलाखत

रा. म. बिवलकर

नानांचा अन् माझा गेल्या १२ वर्षांचा परिचय. पण या बारावर्षात या माणसाचे जे दर्शन मला घडले ते पाहून मी स्तिमित झालो. मॅट्रीकपर्यंत शिक्षण झालेल्या या माणसाच्या विचारांची झेप पाहून थक्क झालो. त्या विचारातील ठाशीवपणा तर मोहून टाकणारा होता. वृत्तीतील बेदरकारपणा, म्हातारपणातलीही धमक, निर्भयपणा लोभसवाणा होता. त्यामुळे दहा डिसेंबर १९७३ या दिवशी नानांच्या वयाला ७५ वर्षे पूर्ण होत आहेत हे लक्षात आल्यावर त्यानिमित्ताने त्यांची मुलाखत ठरवायला एक दिवस मी. त्यांच्या घरी हजर झालो.

: या बिवलकर. माझे दिलखुलास स्वागत झाले. आपल्या गोविंद निवासाच्या सोप्यावरील सोफा खुर्चीत नाना बसले होते. वयामुळे, अवजड शरीरामुळे, मध्यंतरी आलेल्या आजारामुळे त्यांना खाली बसणे कठीण जाते. तरीही नाना उठले. तक्क्या मांडून मला तिथे बसवीत म्हणाले–

: बसा ! लगेच नातवाला हाक गरजली–

: ' पिलू, पानाचे तबक तयार करून आण. बिवलकर आलेत. आणि घरात चार कप चहा सांग '

: नाना, मला चहा नको आहे. मी नाश्ता चहा उरकूनच आलोय्.

: पण मला हवा आहे, पानाचे तबक आले. पान लावता लावता मी म्हणालो,

: नाना, १० डिसेंबरला तुम्हाला ७५ वर्षे पुरी होतात.

: होना.

: त्या निमित्ताने ' माणूस ' करता तुमची मुलाखत घ्यायची माझी इच्छा आहे. आपली त्याला काही हरकत नाही ना ?

: मुळीच नाही. पण एक विचारू ? या ' माणूस'च्या संपादकांना गांवढया गावातल्या माझ्यासारखा एखाद्या माणसात काय इंटरेस्ट ?

: नाना, ' माणूस' फक्त शहरी मंडळी आणि त्यांच्या समस्या यातच इंटरेस्ट घेत नाही. त्यातून मागे दुष्काळाबावत मी तुमची मुलाखत घेतली होती ना– त्यातील तुमचे विचार वाचून श्री. ग. माजगावकरांचे तुमच्याविषयीचे कुतुहल खूप वाढले. मग केव्हा येऊ मुलाखतीला

: केव्हा येऊ विचारता म्हणजे तुम्ही माझी अॅपॉइण्टमेण्ट घ्यायला आलात का ?

: तसे नाही. पण तुम्हाला वेळ केव्हा आहे ?

: अहो आत्ता आपण बसलो आहोत. विचारा तुम्हाला काय विचारायचे ते. पण त्या आधी हा चहा आलाय तो घ्या. पुन: पान लावा. अरे पिलू, माझा सदरा आण बर. असे म्हणत नाना खदखदा हंसले अन् म्हणाले, हो मुलाखतीला बसायचे ते निदान सदरा घालून तरी बसतो.

या बोलण्यावरून तिथे आधीच येऊन बसलेल्या प्राचार्य रामटेके यांना मुलाखतीच्या फोटोची कल्पना सुचली. त्यांनी फोटोग्राफर आरते यांना त्वरित निरोप धाडला. चहापान आटोपल्यावर

मी नानांना म्हणालो,

आता सुरवात करू या.

सिगारेटचा एक दीर्घ झुरका मारीत नाना म्हणाले, खुश्शाल !

: नाना, १९२३ साली तुमचा व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा मुंबईला परिचय कसा घडला, स्नेह कसा जडला, तो कसा वाढत गेला, त्यामुळेच २७ साली तुम्ही मंडळींनी महाडात बहिष्कृत परिषद कशी बोलावली, त्या परिषदेच्या सांगताप्रसंगी कै. अनंतराव चित्र्यांनी, सभेतल्या मंडळींनी रांगेने जाऊन चौदार तळ्याचे पाणी पिण्याची कल्पना कशी काढली, डॉक्टरांनी त्या मुक्तीमोर्चाचे अध्वर्यूपण कसे केले, त्यातून महाडात निर्माण झालेले तणाव, २७ च्या डिसेंबरातली दुसरी परिषद, श्री. बापूसाहेब सहस्रबुद्धे यांच्या हस्ते मनुस्मृती दहन खटला—बहिष्कार हे सारे मुक्तिसंग्रामी महाभारत आम्हाला ठाऊक आहे. तुमच्या आठवणीतही त्याचा उहापोह झाला आहे.

: बिवलकर, जरा थांबा. मला एक सांगा, हे सगळे तुम्हाला माहीत आहे. मी तर तेच जगलो आहे. मग सुरुवातीलाच भगवंताला उलटी गीता ऐकवल्यागत मलाच सगळे कशाला सांगता ? तुमचा प्रश्न काय आहे तो बोला. नाना पुन: दिलखुलास हसले.

: तुमच्या स्मृतीला चालना देण्याकरता हा प्रस्ताव होता, नाना.

: माझी स्मृती अजून पक्की आहे. प्रश्न विचारल्याबरोबर तार जुळेल आणि करंट चालू होईल.

: चौदारतळे प्रकरणात स्पृश्यांनी तुम्हा मंडळींवर जो दावा लावला, त्या प्रसंगी स्पृश्य मंडळींपैकी कुणा मातब्बर मंडळींचे मत अगर सल्ला तुम्ही घेतला होता का ? कारण त्या काळी चौदारतळ्यातले पाणी अस्पृश्यांनी पिणे अगर मनुस्मृतीचे जाहीर दहन होणे या भयंकर क्रांतिकारक घटना होत्या.

: प्रश्न चांगला आहे. चौदारतळे प्रकरणात आम्ही कुणाचा सल्ला मागायला गेलो नाही. सनातनी मंडळींनी आम्हाला कधीच पाठिंबा दिला नसता. आम्ही त्या खटल्यात, चौदारतळ्याचे पाणी अस्पृश्यांनी पिण्यात हिंदुधर्मशास्त्राची कुठे आडकाठी आहे का ? रूढीची अडचण येते का ? या प्रश्नावर मत देण्याकरता अनेक बड्या बड्या मंडळींच्या साक्षी काढल्या होत्या.

: कुणाकुणाच्या साक्षी काढल्यात अगर मत मागवलेत ?

: सांगतो ना. पहिले नाव होते डॉ. कुर्तकोटींचे.

: शंकराचार्यांची साक्ष काढलीत ?

: मग सोडतो काय ? अहो, या खटल्यात देण्याकरता आम्ही महात्मा गांधी, सॉलिसिटर बाळ गंगाधर खेर, पालथेशास्त्री, डॉ. नारायण दामोदर सावरकर आणि भास्कर विठोबा जाधव यांच्याही साक्षी काढल्या होत्या.

: सर्वांनी आपले मत वा साक्ष नोंदवली का ?

: सर्वांनी मते दिली. पण हरिजनांचे उद्धारकर्ते म्हणवून घेणाऱ्या महात्मा

गांधींनी कमिशनद्वाराही कोर्टाला मदत करण्याचे नाकारले ! !

: या बड्या साक्षीदारांची मते काय पडली ?

: प्रत्येकाची मते मुळातूनच वाचायला हवीत. पण धर्मशास्त्राधारे वा रूढी म्हणूनही सार्वजनिक तलावाचे पाणी प्यायला अस्पृश्यांना बंदी करता येते असे त्यांना सिद्ध करता आले नाही.

: हा खटला तुम्ही जिंकला का ?

: जिंकला म्हणजे जिंकलाच. अहो, स्वतः डॉक्टर आमचे वकील. इथे महाडला. पुढे ठाण्याच्या डिस्ट्रिकसेशन कोर्टात आणि मुंबईच्या हायकोर्टातही. लॉ रिपोर्टरमध्ये, एक महत्त्वाचे जजमेंट म्हणून ते जजमेंट ग्रथित केले आहे. पण त्या दहा वर्षांत या भागातल्या अस्पृश्य जमातीला आणि आम्हा स्पृश्य मित्रांना खूप त्रास झाला.

: स्पृश्य हिंदूंनी कसला त्रास दिला ?

: अहो, अस्पृश्यांवर तर त्यांनी बहिष्कारच टाकला. त्यांना कामे देणे बंद केले. महारकीच्या वतनांमुळे त्यांना जे हक्क होते ते धाब्यावर बसवले. महार कुळांना काढून टाकले. त्यांना अन्न, पाणी, वस्त्र, इतर जिन्नस मिळूच नयेत अशी व्यवस्था केली. किती अन्याय आणि जबरदस्तीची उदाहरणे सांगावी ?

: तुम्हाला कितपत त्रास झाला ?

: माझा त्रास विशेष मानीत नाही मी. मी खोत होतो. तरीही माझ्या शेतावर काम करायला कुणी मिळेना. माझे कुठलेच काम करायला मराठे वा कुणबी तयार नव्हते.

: समाजाविरुद्ध उभे राहणे मोठे कठिण असते नाही नाना ?

: सतीचेवाण असते ते.

: नाना, चौदार तळ्याचा सत्याग्रह म्हणजे डॉ. आंबेडकरांच्या राजकीय जीवनाची सुरवात, असे मानले जाते. या संदर्भात, दलितांचा एकमेव पुढारी हे स्थान डॉक्टरांना प्राप्त होण्यास इतर कुठल्या गोष्टी कारणीभूत झाल्या ?

: गेली कित्येक शतके, अस्पृय आणि दलित समाज म्हणजे समाजपुरुषाच्या पायतळीचा वर्ग असे मानण्यात येत होते. त्यामुळे ही माणसे दबली होती. गुलामी जीवन जगत होती. पूर्वजन्मीचे पाप म्हणून या जन्मातली दुःखे भोगीत होती. माणूस म्हणून आपल्याला काही निराळे हक्क आहेत; ते आपण मिळवले पाहिजेत याची जाण वा जागच त्या मंडळींना नव्हती. चौदारतळ्याच्या सत्याग्रहाने त्यांना आपल्या मानवी हक्कांची जाणीव झाली. याकरता स्पृश्यांशी मोठा लढा द्यायला हवा याची अंधुकशी कल्पना आली. आणि या चळवळीत आपले नेतृत्व करू शकेल असा त्यांच्याच जातीचा, रक्ताचा नेता त्यांना डॉक्टरसाहेबांमध्ये सापडला.

साहजिकच महाडच्या बहिष्कृत परिषदांनंतर मुंबईप्रांतात ठिकठिकाणी अस्पृश्यांच्या सभा, संमेलने, मेळावे भरू लागले. कोकणातील कितीतरी अस्पृश्य मुंबईत असल्याने मुंबईत अशा शेकडो सभा भरू लागल्या. काही तरुण मंडळींनी समाज समता संघ (Social

Equality League) स्थापन केली. यात श्री. देवराव नाईक, डी. व्ही. प्रधान, बॅरिस्टर माने, श्री. केणी, श्री. बी. कद्रेकर आदी स्पृश्य हिंदू मंडळींचा पुढाकार होता.

यातून चळवळ फोफावली. त्यातून नाशिकचा काळाराम मंदिर सत्याग्रह, अमरावतीचा अंबा मंदिर सत्याग्रह, पुण्याचा पर्वती–सत्याग्रह अशा मोहिमांचा जन्म झाला. या मंदिर-प्रवेशाच्या चळवळीत नाशिकचे प्रा. सबनीस, अमरावतीचे डॉ. पंजाबराव देशमुख, पुण्याचे काका गाडगीळ, केशवराव जेधे, केसरीच्या संपादकांचे वडील श्रीधर टिळक आणि माझे परम-मित्र श्री. एस. एम. जोशी या स्पृश्य मंडळींनी महत्त्वाचा वाटा उचलला होता.

डॉक्टरांनी २७ साली काढलेल्या 'बहिष्कृत भारत' या साप्ताहिकावाटे प्रचार जोरात चालू होता. लवकरच डॉक्टरांची चळवळ देशव्यापी बनली. बंगालचे श्री. जोगेंद्रनाथ मंडळ, मद्रासचे रावबहाद्दुर एन. शिवराज, गुजराथचे डॉ. सोळंकी अशी बडी मंडळी त्यात सामील झाली. त्यामुळे वर्षा-दोन वर्षांतच डॉ. आंबेडकर, ७ कोटी अस्पृश्यांचे पुढारी म्हणून ओळखले जाऊ लागले. त्यामुळेच १९३०साली, ब्रिटिश सरकारने त्यांना महात्माजींच्या बरोबरीने, राऊंड टेबल कॉन्फरन्सकरता लंडनला पाचारण केले.

: ब्रिटिश सरकारने डॉक्टरांना राऊंड टेबल कॉन्फरन्सकरता लंडनला का बोलावले ?

: हे सांगण्याकरता या कॉन्फरन्सची थोडी पार्श्वभूमी सांगतो. भारतीय काँग्रेसने स्वातंत्र्याकरता चालविलेल्या चळवळीला त्यावेळी गती आली होती. २८–२९ साली, भारताला संपूर्ण स्वातंत्र्य मिळावे अशी मागणी करणाऱ्या नेहरू रिपोर्टवर सर्वत्र चर्चा चालू होती. १९२९ सालच्या डिसेंबरमध्ये भरलेल्या लाहोर काँग्रेसमध्ये हा स्वातंत्र्याचा ठराव संमत झाला आणि २६ जानेवारी हा दिवस स्वातंत्र्य दिन म्हणून घोषित करण्यात आला. या घोषणेतून ३० सालची चळवळ सुरू झाली. गांधींची गाजलेली दांडी यात्रा निघाली आणि मिठाच्या सत्याग्रहाने रान पेटवले. काँग्रेसने सुरू केलेल्या या लढ्याबद्दल डॉ. बाबासाहेबांना सहानुभूती होती.

: डॉक्टरांना सहानुभूती होती. त्यांनी प्रत्यक्ष काही केले का ?

: डॉक्टरांनी सत्याग्रह चळवळीत प्रत्यक्ष भाग घेतला नाही. पण तुम्हाला आश्चर्य वाटेल. या काळातील, महाडा-तल्या एका जाहीर सभेत डॉक्टरांनी एक मिठाची पुडी जाहीर रीतीने विकली होती. शिवाय माझ्यासारख्या त्यांच्या काही अनुयायांना सत्याग्रहाच्या निमित्ताने तुरुंगात जायला त्यांनी संमतीही दिली होती.

: नाना, तुम्ही तर कधी काँग्रेसमध्ये नव्हता. मग तीस सालच्या चळवळीत सत्याग्रह करून तुम्ही तुरुंगात गेलात ?

: गेलो होतो ना. सहा महिने होतो तिथे.

: तुम्ही सत्याग्रह केलात ?

: नाही.

: मग तुम्ही कसे तुरुंगात गेलात ?

: तीस साली असहकार चळवळीने महाडात मोठे तीव्र स्वरूप धारण केले होते. गावातील व्यापाऱ्यांनी आणि इतर मंडळींनी, सरकारी नोकरांना काहीही माल विकायचा नाही असा निर्णय घेतला होता. मी नगरपालिकेचा सभासद होतो आणि मनोहरच्या लग्नानंतर या चळवळीला अधिक धार चढवायचा निश्चयही मी केला होता. पण मनूच्या (धाकट्या भावाच्या) लग्नाच्या आदल्याच दिवशी जिल्ह्याच्या डी. एस्. पी. ने आपल्या पोलिसांचा गराडा श्री. देवचंद कृष्णा तलाठी यांच्या दुकानाला घातला आणि दुकानातला माल जबरदस्तीने बाहेर काढून तो सरकारी नोकरांना वाटू लागला. आमच्या घरात विवाहानिमित्त काही धार्मिक कृत्य चालू होते त्यात मी गुंतलो होतो. तेवढ्यात आमचा चंद्रकांत अधिकारी धावत आला.

: नाना — चंद्रकांत अधिकारी म्हणजे गोरेगावचे ॲडव्होकेट चंद्रकांत अधिकारीच ना? परवा ९ नोव्हेंबरला त्यांनाही सरकारने 'दलित मित्र' ही पदवी अर्पण केली, तेच ना ?

: तोच, तो पहिल्यापासून या चळवळीत आहे. शिकायला माझ्याकडेच होता ना.... तर तो धावत आला. त्याने डी. एस्. पी. ची अरेरावी माझ्या कानावर घातली. मी तडकलो. लग्नाच्या मांडवातून उठलो. शर्टही चढवला नाही. तसाच उघडा, बोडका निघालो. पेठेत आलो. पिंपळपाराजवळ पोलिसांचे कडे होते. मी सरळ तिथपर्यंत पोचलो, पोलीस इन्स्पेक्टर श्री. हमदुले याने मला अडवले. म्हणाला,

: पुढे जाता येणार नाही.

: का ?

: डी. एस्. पी. साहेबांची ऑर्डर आहे.

: मी ती मानीत नाही. मी म्युनिसिपॅलिटीचा सभासद आहे. हा रस्ता म्युनिसिपॅलिटीचा आहे. यावरून कुठेही जायचा मला अधिकार आहे. हो बाजूला.

: अरे जारे ××× त्याची शिवी ऐकताच माझा राग टाळूला भिडला. त्या तिरमिरीत मी हमदुल्यांच्या ढेंगात पाय घालून त्याला सडकेवर उताणा पाडला. एक लाथ हाणली आणि पुढे निघालो. म्हणालो,

'माझ्या मार्गात येईल त्याला मी असा ढेंगावर मारतो समजलास. तुझ्या पिटुकनळीचे भय तू भितुरड्यांना दाखव. पोलिसांनी मला गॅंग करायचा प्रयत्न केला. पण डी. एस्. पी. ने त्यांना थांबवले. मला माझ्या मार्गाने घरी जाऊ दिले. पण अर्ध्या तासात शितून मामलेदारांचे वॉरंट घेऊन तो पोलिस पार्टीसह माझ्या घरी आला आणि त्याने मला अटक केली.

: म्हणजे सत्याग्रह केलात म्हणून तुम्ही तुरुंगात गेला नाहीत.

: अहो, त्या आधीच अन्याय दिसला. अन्यायाची तिडिक मला पहिल्यापासून आहे. मग पुढला मागला विचार नाही.



# डोकं दुखतंय् ?

## प्रभावी आणि विश्वसनीय ॲनासिन त्वरित आराम देते



"माझं डोकं पुष्कळदा दुखतं. ॲनॅसिनपासून मला खराखुरा आराम मिळतो." बँकेत अधिकाराच्या जागेवर काम करणारे श्री. सुरेश देसाई यांचं हे मत.

**प्रभावी :** जगभर डॉक्टर्स ज्याची शिफारस करतात असे वेदनाशामक द्रव्य ॲनासिनमध्ये अधिक प्रमाणात असते. ॲनासिनमुळे वेदनांपासून त्वरित आराम मिळतो.

**विश्वसनीय :** श्री सुरेश देसाईसारख्या लक्षावधि व्यक्तींचा ॲनासिनवर विश्वास आहे. डॉक्टरांच्या बिनधोक औषधांसारखेच अनेक औषधींचे मिश्रण त्यात असते.

सर्दी-पडसे, फ्लू, डोकेदुखी, पाठदुखी, स्नायूदुखी आणि दातदुखी यांवर परिणामकारक.

प्रभावी आणि विश्वसनीय

## ॲनासिन

भारताचे अत्यंत लोकप्रिय वेदनाशामक



Regd. User of TM : Geoffrey Manners & Co. Ltd.

: मग मनोबांचे लग्न ?

: ते गावातल्या लोकांनी लावले दुसऱ्या दिवशी. खूप मोठी मिरवणूक काढली त्यांनी. शितूत रावसाहेबांच्या दारात शिमगाही केला.

: तीस साली, डॉक्टर राऊंड टेबल कॉन्फरन्सला गेले. इथपर्यंत आपण मघा आलो होतो. कॉन्फरन्समध्ये डॉक्टरांनी कोणती कामगिरी बजावली?

: तीस सालची सत्याग्रह चळवळ हे स्वातंत्र्याकरता देशव्यापी आंदोलन होते. ब्रिटिश सरकारवर, नाही म्हटले तरी त्याचे खूप मोठे दडपण आले. त्यातून गांधी-आर्यविन करार झाला आणि भारतातील विविध नेत्यांनी लंडनला जमावे आणि स्वातंत्र्यासाठी ब्रिटिशांशी वाटाघाटी कराव्यात असे ठरले. म्हणून ती राऊंड टेबल कॉन्फरन्स होती.

या परिषदेत, महात्मा गांधींनी संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी केली. इतर समस्या भारतीय नेते आपापसात मिटवतील असे त्यांचे म्हणणे होते. पण मुस्लीम नेते बॅरिस्टर जिना यांनी गांधींना विरोध केला. भारताला स्वातंत्र्य दिल्यास मुस्लीम जनतेचे हित असुरक्षित राहील असा त्यांचा दावा होता. डॉक्टर आंबेडकरांनी गांधींची स्वातंत्र्याची मागणी उचलून धरली पण भारतातील सामाजिक उच्चनीचतेचा विचार करता स्वतंत्र भारताच्या घटनेत काही विशेष राजकीय संरक्षण दलित वर्गीयांना मिळाले पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. नाहीतर स्वतंत्र भारताच्या सरकारात ७ कोटी अस्पृश्य जनतेला प्रतिनिधित्वच मिळणार नाही अशी त्यांची खात्री होती. अस्पृश्यांकरता स्वतंत्र मतदारसंघाची मागणी ती हीच.

अस्पृश्यांना असे वेगळे राजकीय संरक्षण देण्यास गांधींचा विरोध होता. इतका की, डॉक्टरांनी आपला आग्रह ताणून धरताच ते कॉन्फरन्समधून तणतणत निघून गेले. या कॉन्फरन्समध्ये डॉक्टरसाहेबांचे उत्कृष्ट वादपटुत्व सिद्ध झाले. दलितांच्या मागण्यांचा एक जाहीरनामाच त्यांनी कॉन्फरन्सपुढे ठेवला.

पहिली राऊंड टेबल कॉन्फरन्स अशी अयशस्वी ठरली. पण ब्रिटिश सरकारने आपली भारताच्या संभाव्य प्रजासत्ताकाची योजना मांडताना अस्पृश्यांकरता वेगळ्या मतदारसंघाची डॉक्टरांची मागणी मान्य केली हा डॉक्टरांचा विजयच म्हणायला हवा.

: मग गांधीजी चिडले असतील ?

: ते तेव्हा येरवडयाच्या तुरुंगात होते. अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ मान्य झाल्याचे समजताच त्यांनी जेलमध्ये प्राणांतिक उपोषण मांडले. झाले. भारताच्या महान् नेत्याचे प्राण धोक्यात आले ! सर्व बाजूंनी डॉक्टरांवर दडपणे येऊ लागली. राष्ट्राच्या महान् नेत्याचे प्राण वाचविण्याकरता डॉक्टरांनी पडते घ्यावे, समझौत्याला तयार व्हावे असे सुचविण्यात आले. निरोपांची जा ये चालू होती. गांधी माघार घ्यायला तयार नव्हते. डॉक्टरांनी पाठविलेले कॉम्प्रमाइज फॉर्मुले त्यांना पसंत पडत

नव्हते. अखेर शवटी डॉक्टरांनी गांधींची जेलमध्ये प्रत्यक्ष भेट घ्यावी असे ठरले. या भेटीत डॉक्टरांनी आपला 'कॉम्प्रमाईज फॉर्म्युला' गांधीजींपुढे ठेवला. त्यावर नजर टाकून ते म्हणाले,

: या गोष्टी मला मान्य आहेत.

: पंधरा दिवसापूर्वीच मी या तुमच्या सहकाऱ्यांजवळ दिल्या होत्या.

: पण हे मुद्दे माझ्याकडे कुणीच आणले नाहीत !

: ही मधल्यांची किमया तर !

हाच १९३२ चा गांधी–आंबेडकर पुणे करार.

: नाना, पुणे करारामुळे डॉक्टर व गांधीजी यांच्यातले नाते सुधारले का ?

: मुळीच नाही. ते सुधारणे कधीच शक्य नव्हते.

: का ?

: एक तर, डॉ. आंबेडकरांच्या पुढाकाराने दलित वर्गीयांना काही विशेष अधिकार मिळणे गांधीजींना नापसंत होते आणि दुसरे म्हणजे, दलितांच्या समस्यांकडे पाहाण्याचा डॉक्टरांचा दृष्टिकोन आणि गांधींचा दृष्टिकोन यात तत्त्वप्रणालीचा फरक होता.

: नाना, माफ करा. तुमचे पहिले विधान जरा खटकले. दलितोद्धार चळवळीचे अध्वर्यू म्हणून जग गांधीजींना ओळखते. जर डॉ. आंबेडकरही दलितांच्या उद्धारासाठी झगडत होते, मग डॉक्टरांच्या पुढाकाराने दलितांना कोणतेही विशेष अधिकार मिळाले तर ते गांधीजींना नापसंत होते असे तुम्ही म्हणता याचा अर्थ काय ?

: अर्थ सरळ आहे, बिवलकर. हा प्रश्न पुढारीपणाचा व क्रेडिटचा आहे. गांधीजी स्वतःला संपूर्ण भारताचे एकमेव पुढारी मानीत असत. बॅ. जिना त्यांना हिंदूंचेच पुढारी म्हणून हिणवीत असत ! आता हिंदूंतील दलितांचे व अस्पृश्यांचे पुढारीपण डॉक्टरांकडे गेले व त्यांना मिळणाऱ्या अधिकाराचे क्रेडिटही डॉक्टरांना मिळाले तर ते गांधींना कसे आवडेल ?

: महात्मा गांधींच्या व डॉ. आंबेडकरांच्या तत्त्वप्रणालीत मूलतः महदंतर होते असे तुम्ही म्हणालात, ते कसे काय?

: गांधीजींची तत्त्वप्रणाली मोठी पुरोगामी भासली तरी तिची मूलतः बैठक सनातनी हिंदू तत्त्वज्ञानाच्या चातुर्वर्ण्य पद्धतीच्या सामाजिक ढाच्यावर आधारलेली होती. म्हणूनच मी अनेक वेळा म्हणतो की, समाजसुधारणेबाबत गांधींची कामगिरी, जेवढा ढोल पिटतात तेवढया महत्त्वाची खचित नाही. चातुर्वर्ण्य पद्धती मानली की सामाजिक समता त्वरित हद्दपार झाली नाही का ? मग दलितोद्धार ही गोष्ट उच्चवर्णीयांनी दाखविलेल्या दयेवरच अवलंबून राहाणार ! उच्चवर्णीय मंडळी दलितांना अमानुषपणे वागवतात त्याबद्दल गांधींना खंत होती. पण दलितांना चांगली वागणूक मिळायची तर उच्चवर्णीयांचे हृदयपरिवर्तन झाले पाहिजे अशी त्यांची धारणा होती आणि ते कार्य अपील आणि परस्युएशनेच करायचे अशी त्यांची पद्धती होती.

डॉ. आंबेडकरांना ही गोष्ट मान्य

नव्हती. उच्चवर्णीयांनी कनिष्ठ वर्णीयांची पिळवणूक करण्याकरताच जातीपाती तयार केल्या. मानवामानवातील हे मनुष्यनिर्मित भेदभाव आज इतक्या पराकोटीला गेले आहेत की समाजक्रांतीवाचून जातीयतेचे समूळ उच्छेदन करणे शक्य नाही अशी डॉक्टरांची धारणा होती. दलितवर्गीयांना आपला जन्मदत्त अधिकार म्हणून माणुसकीची वागणूक व मानवी अधिकार हवे आहेत. कुणाची दया म्हणून या गोष्टी स्वीकारायला ते तयार नाहीत ही डॉक्टरांची भूमिका होती. म्हणूनच या दलितांना आपल्या अधिकारांची जाण व जाग आणण्याची डॉक्टरांची धडपड होती. गांधींना समाजातील हा वर्ग जागा व्हायला नको होता. तोंडाने ते अंत्यजोदयाच्या कितीही गप्पा मारीत असले तरीही ही गोष्ट खरी आहे. उच्च वर्णीयांच्या हृदयपरिवर्तनातूनच कदाचित त्यांना अंत्यजोदय साधायचा असेल! डॉक्टरांना समाजाचे ते दुसरे टोक जिवंत करायचे होते !

: हे कशावरून ?

: एक उदाहरणच देतो ना. पंजाबात 'जातपात तोडक मंडळ' नावाची एक संस्था होती. सर गोकुळचंद नारंग नावाचे गृहस्थ तिचे अध्यक्ष होते. त्यांनी या मंडळाच्या लाहोर अधिवेशनाकरता, डॉक्टरसाहेबांना अध्यक्ष म्हणून पाचारण केले. ते भाषण छापायला देण्याअगोदर सर गोकुळचंदांनी ते गांधींना दाखवले वाटते. त्या भाषणातील काही भाग उच्चवर्णीय हिंदूंची मने दुखावील सबब तो काढून टाकावा, असा सल्ला महात्माजींनी सर गोकुळचंदांना दिला. सर गोकुळचंदांची तशी विनंती पुढे येताच, डॉ. आंबेडकरांनी भाषण कापायला तर नकार दिलाच पण अधिवेशनाचे अध्यक्षपद स्वीकारण्याचेही नाकारले. पुढे त्यांनी ते भाषण 'ॲनिहिलेशन ऑफ कास्ट्स्' या नावाने पुस्तकरूपाने प्रसिद्ध केले. वाचलंय का हे पुस्तक? मुद्दाम वाचा. डॉक्टर म्हणजे काय ताकदीचा माणूस होता ते कळेल तुम्हाला त्यावरून.

: नाना, ध्येय एक पण मार्ग भिन्न असलेल्या या दोन महापुरुषांच्या कार्याचा एकमेकावर काहीच परिणाम झाला नाही का ?

: डॉक्टरांवर गांधीचा काहीच परिणाम झाला नाही. गांधींना मात्र अपृश्य मंडळी, आपण त्यांच्याकरता एवढे करीत असूनही आपल्याला त्यांचा नेता मानीत नाही याची खंत होती. एकदा गांधींना भेटायला डॉक्टर वर्ध्याला गेले होते. तेव्हा तर त्यांनी आपली मळमळ बोलून दाखविली. म्हणाले, 'हरिजनाकरता मी एवढे करीत असूनही ते मला न मानता तुम्हाला मानतात हे कसे ?

: डॉक्टरांनी काय उत्तर दिले ?

: डॉक्टर म्हणाले, 'मिस्टर गांधी, यात नवल काय आहे ? अहो तुम्ही त्यांच्याकरता कितीही केलेत तरी तुम्ही त्यांची 'दाई' आहात. मी त्यांची 'आई' आहे. नाना पुनः मोठ्याने हसले, घड्याळात पाहून म्हणाले, 'अरे

एक वाजला की. मंडळी काही जेवायचे बिवायचे भान आहे की नाही तुम्हाला ?'

: खरंच की. मग काय करू नाना ? आम्ही जेऊन येतो. किती वाजता परत बैठक ?

: आज करंट चांगला लागलाय. बैठक मोडली की पुन: रंग जमणार नाही. तुम्ही उठावे म्हणून नाही मी जेवणाची आठवण काढली. अरे, पिलू, पाने वाढली का ? चार पाने जास्त मांडायला सांग. आज ही मंडळी इथेच जेवतील आणि हे बघ, बिवलकर आणि रामटेके यांच्या घरी जाऊन निरोप सांग, म्हणावे ही मंडळी रात्री घरी येतील. नाना पुन: मोठयाने हसले. म्हणाले–

: बोला बिवलकर. पाने वाढीपर्यंत काम पुढे चालू.

नाना, गांधींचा डॉक्टरांवर परिणाम झाला नाही म्हणता मग डॉक्टरांचा गांधीवर परिणाम झाला असे तुमचे म्हणणे आहे का ?

: अहो, तसे माझे मत आहे असे म्हणण्यापेक्षा ते एक सत्य आहे.

: कसे काय ?

: डॉक्टरांचा स्टँड अॅग्रेसिव्ह होता. त्यामुळे गांधींनी आपल्या सर्वोदयी पद्धतीत भंगीमुक्ती, चर्मकाम, साफसफाई या गोष्टींचा समावेश केला. इट वॉज अ काईंड ऑफ डिफेन्स,

: नाना, अजून पर्यंत समाजक्रांतीकारक म्हणून डॉ. आंबेडकरांसंबंधी आपली चर्चा चालू आहे. चर्चेला थोडे वेगळे वळण देऊ का ?

: द्या की. पण आता जेवणे झाल्यावर. पाने वाढलीना रे ? चला उठा मंडळी.

जेवणे झाल्यावर आम्ही पुन: बैठकीवरआलो. पान लावले.

: नाना, तुम्हाला थोडी वामकुक्षी करायची असली तर... .

: उभ्या ७५ वर्षांच्या आयुष्यात मी दुपारी कधी झोपलो नाही. वाचीत पडतो. तुम्ही प्रश्न सुरू करा.

: समाज क्रांतीचे एवढे काम समोर असता डॉक्टर राजकारणाच्या रिंगमध्ये का उतरले ?

समाजकार्याकरता राजकारणाची जरूर होती म्हणून.

: मी नाही समजलो.

: १९३५ साली आणखी एक गोलमेज परिषद झाली. भारताला प्रजासत्ताक घटना देणारा पत्तीस सालचा कायदा येऊ घातला होता. आपले काँग्रेसमधील अनुयायी लोकनियुक्त प्रतिनिधी या नात्याने देशाची शासनयंत्रणा हाती घ्यायला आसुसले आहेत याची गांधींना जाणीव झाली. त्यामुळे त्यांनी काँग्रेसच्या सभासदत्त्वाचा राजीनामा दिला आणि अनुयायाना पक्ष म्हणून निवडणुका लढविण्याची परवानगी दिली.

: मी काँग्रेसचा चार आणेवालाही सभासद नाही असे महात्माजी म्हणत त्यामागे ही भूमिका होती म्हणायची.

: बरोबर आहे ना. आता काँग्रेस 'पक्ष' म्हणून निवडणुका लढवणार मग आपलाही एखादा राजकीय पक्ष हवा

असे डॉक्टरांना वाटले. यातून 'इंडिपेंडंट लेबर पार्टी'चा १९३६ साली जन्म झाला.

: नाना, 'इंडिपेंडंट लेबरपार्टी' हा राजकीय पक्ष होता ना ?

: पार्टीच्या कार्यक्रमावर मते टाकण्याइतकी या देशातील जनता शिक्षित आणि विचारी असती तर आमच्या पार्टीने या देशात मते मिळवण्याचा विक्रम केला असता एवढा आमचा कार्यक्रम उत्तम होता. १५ ऑगस्ट १९३६ च्या टाईम्समध्ये तो प्रसिद्धही झाला होता.

: काय होता तो कार्यक्रम ?

: तोच सांगतोय् ना. त्याचे प्रीअँम्बल असे होते – 'या देशातील जनता अज्ञानी आणि दरिद्री आहे. समाजातील वरच्या वर्गांचे लोक तिची सातत्याने पिळवणूक करीत आहेत. या जनतेच्या आणि दलितांच्या इच्छा – आकांक्षा, भावना, दुःखे या गोष्टी विचारात घेऊन मी उच्चस्तरातील 'प्रिव्हिलेज्ड' मंडळींना सांगून इच्छितो की त्यांनी आता सावध व्हायला हवे नाही तर त्यांचा उच्छेद झाल्यावाचून राहणार नाही !'

इंडिपेंडंट लेबर पार्टीच्या त्या कार्यक्रमात भारतीय जीवनाच्या राजकीय, सामाजिक आणि आर्थिक अशा सर्व अंगांचा विचार केलेला होता. सामाजिक सुधारणा, ग्रामोन्नत्ती, शिक्षण, सुविहीत शासन या गोष्टींवर त्यात विशेष भर देण्यात आला होता.

प्रिव्हिलेज्ड क्लासेसचे हितसंबंध जपणाऱ्या विधानपरिषद वा राज्यसभा या सारख्या सेकंड चेंबर्सना पार्टीचा विरोध होता. गव्हर्नरांना विशेष अधिकार देण्यालाही आमचा विरोध होता. कृषि-उद्योग आणि वाहातूक या क्षेत्रातील विकास आम्हाला त्वरित घडवून आणायचा होता. सामान्य माणसाचे जीवनमान वाढविणे हे आमचे ध्येय होते. सामाजिक, आर्थिक आणि राजकीय समता प्रस्थापित करणे हे आमचे लक्ष्य होते. आणि सर्वप्रकारचे विशेषाधिकार कमी करणे हे आमचे नजिकचे उद्दिष्ट होते.

नाना ३६ सालात गेले होते. आपल्या पार्टीचा कार्यक्रम सांगण्यात रंगले ! पण मी मध्येच विचारले,

: माफ करा नाना. कदाचित माझा प्रश्न तुम्हाला वेडा वाटेल. पण राजकीय पक्ष यशस्वी व्हायचा तर ग्रामीण जनतेतत त्याला ग्राऊंडिंग नको का ? तसे तुमच्या पक्षाला होते का ?

: आजकाल ताजमध्ये, नटराजमध्ये नाहीतर अशोक हॉटेलात एका रात्रीत निराळा राजकीय पक्ष जाहीर होतो. कुठे कुणाच्या हितसंबंधाना धक्का पोचला की तो पक्ष सोडतो वा निराळा पक्ष काढतो. भाकरीचे तुकडे टाकून वा आश्वासने देऊन माणसे आपल्या बाजूला आणतो. या आयारामी गयारामी वातावरणात तुमचा प्रश्न वेडा नव्हे योग्य आहे. मला तो आवडला.

पण स्वतंत्र मजूरपक्षाची बैठक स्वप्नाळू नव्हती. त्याचा पाया आधीच्या दहा वर्षात घातला होता. आम्ही २७

सालापासून डॉक्टरांचा दलितमुक्ती संग्राम सुरू केला. या चळवळीने लवकरच सर्व पीडित जनतेच्या उत्थानाचे स्वरूप धारण केले. या देशात खेडोपाडी सावकार, खोत, जमीनदार गरीब जनतेला नाडीत होते. त्यांच्यावर वाट्टेलतशी जुलूम जबरदस्ती करीत होते. तुमच्या 'माणूस'ने मध्ये 'शहादा प्रकरण' गाजवले ना ? पण त्या काळात प्रत्येक खोत, सावकार, जमीनदार म्हणजे अन्यायाची मूर्तीच होता. यांत ब्राह्मण होते, रावमराठे होते, मुसलमान होते, गुजर सावकार होते.

यादेशात खरोखर शेतात घाम गाळणारा प्रत्येक शेतकरी जवळ जवळ भूमिहीन आहे. ही माणसे खोता जमिनदारांच्या जमीनी खंडाने करीत. कायम कुळे म्हणून नव्हेत तर प्रतिवर्षी लिहून घेतलेल्या 'कबुलायती'तील अटीप्रमाणे. या गरीब लोकांच्या डोक्यावर टांगती तलवार असायची. मग त्यांना प्रतिवर्षी ६० दिवसांची 'वेठबिगार' करावी लागे. तो एकवेळचीच भाकरी देई. मजुरी नाही. ही सारी खोताचीं कुळे त्याच्या कर्जात गळ्याएवढी बुडालेली असत. खोत वा सावकार मळणीच्या खळ्यावर आपले पैन् पै येणे वसूल करीत. कधी मदत दावे, कधी दिवाणी दावे यांनी त्यांना हैराण करीत. खंडाच्या जमिनीची खात्री नाही, कर्जाला मिती नाही, जीवनाला सुरक्षितता नाही ! कुटुंबजीवनात नीती —सावकाराने वा खोताने पाळली तरच ! हे गुलामाचे जीणे होते.

ठाणे, कुलाबा व रत्नागिरी या ती जिल्ह्यापुरतेच मी बोलतो. डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली, मी, माझे मेव्हणे भाई अनंतराव चित्रे, चंद्रकांत अधिकारी, कै. नारायण नागू पाटील आणि इतर काही मंडळींनी या शेतकऱ्यांना संघटीत करायला सुरवात केली. डॉक्टरांच्या अनुयायी मंडळींनी—महारांनी आम्हाला चांगलाच प्रतिसाद दिला. मोठी हुषार जात. बुद्धिमान्, इमानी. त्यांनी खोता—जमिनदारांविरुद्ध या देशात पहिल्याने बंडाचे निशाण उभे केले ! मग इतर दलित वर्गीयांनी व दरिद्री कुणबी आदी जमातींनी त्यांच्याशी मिळवणी केली. खोतजमीनदारांविरुद्ध वातावरण तापू लागले. आम्ही झंझावाती प्रचार करीत होतो. अन्यायाविरुद्ध दंड थोपटून उभे राहात होतो. गावोगावीच्या खोतासावकारांची आम्ही त्रेधातिरपीट उडवली. त्या चळवळीतल्या एका भाषणावरून मला आणखी एक तुरुंगाची वारी ही घडली. १९२७ ते ३५ या नऊ वर्षात आम्ही केलेल्या या जबरदस्त उठावणी मुळे स्वतंत्र मजूरपक्षाला खोलवर गेलेली, जनमनात रुजलेली पीठिका लाभली.

: नाना, खोताजमीनदारांविरुद्ध महारांनी पहिले बंडाचे निशाण या देशात उभारिले असे तुम्ही म्हणाला.

: हो. या देशाच्या शेतकरी-चळवळीच्या इतिहासात आमच्या या प्रयत्नाचा 'पायोनियरिंग एफर्ट' असाच उल्लेख करावा लागेल. या संदर्भात महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीने नेम-

लेल्या पेझण्ट्स् इन्क्वायरी कमिटीचा अहवाल तुम्ही अवश्य वाचा. श्री. मामा देवगिरीकर त्या कमिटीचे अध्यक्ष होते. आणि सभासदात न. वि. गाडगीळ, के. एम. जेधे, रावसाहेब पटवर्धन, र. के. खाडीलकर अशा नामवंतांचा समावेश होता.

: शेतकरी चळवळीमुळे स्वतंत्र मजूर पक्षाला ग्रामीण भागात पाठिंबा तयार केला होता पण शहरी भाग? निवडणूक म्हटली की शहरी पाठिंब्याचा प्रश्नही महत्त्वाचाच नाही का?

: हो ना. ग्रामीण भागात शेतकरी चळवळ तर शहरी भागात कामगार चळवळ आणि म्युनिसिपल वर्कर्स युनियन्स! आमच्या मंडळींनी भंगी आणि सफाई कामगारांची अखिल भारतीय संघटना सर्व प्रथम बांधली असे मी अभिमानाने सांगेन. मुंबई म्युनिसिपल कामगार संघ आम्ही १९३५ साली संघटित केला. पुढे न्यायमूर्ती भोळे यांच्या अध्यक्षतेखाली त्याला अखिल भारतीय फेडरेशनचे स्वरूप प्राप्त झाले. सिद्धार्थ लॉ कॉलेजचे प्राचार्य आणि मुंबईचे भूतपूर्व महापौर श्री. पी. टी. बोराळे यांना भंग्यांच्या संपाचे पुढारीपण करण्याबद्दलच तुरुंगात जावे लागले होते.

: तुमच्या या कामगार चळवळीचे पुढारी कोण होते?

: मघा मी समाज समता संघाचा उल्लेख केला ना? त्याच मंडळींनी कामगार चळवळीचे पुढारीपण पत्करले होते.

: नाना, डॉ. आंबेडकरांनी तुम्हाला स्वतंत्र मजूर पक्षाचे मुख्य संघटक म्हणून नेमले होते. स्वतंत्र मजूरपक्षाच्या राजकीय कार्यावर थोडा प्रकाश टाकाल का?

: का नाही. पक्ष स्थापन झाला. ३७ सालच्या निवडणुकी तोंडावर आल्या होत्या. माझ्याकडे महाराष्ट्राचा संघटक म्हणून जे काम होते त्या दृष्टीने मी प्रांतात सर्वत्र जाऊन पक्षाचे उमेदवार नक्की केले. नक्की आकडा सांगणे कठीण पण माझ्या आठवणीप्रमाणे आम्ही १६ जागा लढवल्या आणि प्रांतिक विधानसभेत १४ जण निवडून आणले.

स्वतंत्र मजूर पक्षाने प्रांतिक विधानसभेत 'खोती अॅबॉलिशन बिल', 'गाव कामगार वतन अॅबॉलिशन बिल' आणले. या बिलांबाबत आम्ही लोकमत जागृत केले. मला वाटते, भारतीय लोकशाही सरकाराच्या इतिहासात मुंबई विधानसभेवर पहिला शेतकरी मोर्चा नेला गेला. जेव्हा या प्रयत्नांनाही यश आले नाही, तेव्हा आम्ही प्रांतभर शेतकऱ्यांचे संप घडवून आणले. संपानेही निभेना तेव्हा, कोकणी जिल्ह्यातील महारांनी 'जमीन बळकाव' मोहीम आखली. हजारोंच्या संख्येने तुरुंग भरले. आजच्या 'लॅण्डग्रॅब' चळवळीच्या पुढाऱ्यांनी आम्ही याही बाबतीत पायोनियर्स आहोत हे लक्षात ठेवले पाहिजे. या चळवळीतील माझ्या एका भाषणाबद्दल काँग्रेस सरकारने माझ्यावर खटला भरला होता. मला शिक्षाही झाली.

: नाना, ते तुमचे भाषण मिळेल ? खटल्याचा वृत्तांत समजला तर शेतकरी चळवळीवर निराळा प्रकाश पडेल.

: अहो, पी. बॉ. हार्टी नामक न्यायाधिशाच्या त्या जजमेंटवरून सर्व गोष्टी कळू शकतील. २०–७–३९ या दिवशी न्यायाधीशांनी मला दोषी ठरवून शिक्षा दिली. थांबा हं.

नानांनी उठून घरातून एक जुनी फाईल आणली. त्या केसचे सारे कागदच आमच्यापुढे उलगडले. मूळ भाषणाचा सरकारी अहवाल वाचून मी तर चाटच पडलो. नानांचे ते भाषण भलतेच कडक आणि जहाल होते.

: नाना, तुम्ही तुरुंगातून सुटून आल्यावर काय केलेत ?

: तुरुंगातून सुटलो तो दुसरे महायुद्ध सुरू झाले होते. सरकारच्या युद्ध प्रयत्नात सहभागी न होण्याचे धोरण ठरवून काँग्रेस सरकारने राजीनामा दिला होता. साहजिकच स्वतंत्र मजूर पक्षासारख्या राजकीयपक्षापुढे आता कार्यक्रमच उरला नाही. पण आम्ही जंजिरा मुरूड संस्थानातील मुसलमान खोताच्या अन्यायाविरुद्ध, जुलूम जबरदस्तीविरुद्ध लढा चालू ठेवला. चंद्रकांत अधिकारी, शंकरराव खुळे, धोंडबा इंदुलकर आणि मी आता सुलतानाविरुद्ध दंड थोपटले !

: याच काळात डॉ. आंबेडकर व्हॉइसरॉयच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलवर घेतले गेले.

: डॉक्टरांचा सरकारी युद्धप्रयत्नांना पाठिंबा होता का ?

: डॉक्टरांना युद्धाबाबत सरकारशी असहकार मान्य नव्हता. त्यामुळे ते सरकारात गेले. याच दरम्यान त्यांनी शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना केली. पुढच्या घटना तुम्हाला माहीत आहेत. युद्ध संपले. तात्पुरते सरकार आले. मग फाळणी झाली. स्वातंत्र्य मिळाले. गांधींची हत्या घडली. निर्वासितांचे लोंढे आले. तरीही घटना समिती नेमली गेली. भारतीय घटना तयार करणाऱ्या समितीचे डॉक्टर चेअरमन झाले. ५० साली प्रजासत्ताक झाले. डॉक्टर, नेहरूसरकारात कायदेमंत्री झाले. या अवधीत त्यांनी हिंदू कोड बिल तयार केले. पण लोकसभेतील सनातन्यांनी त्यांना विरोध केला. प्रगत विचारी म्हणून प्रसिद्ध असलेल्या नेहरूंनीही काँग्रेसमधील प्रतिगाम्यांची री ओढली. डॉक्टर मंत्रिमंडळातून बाहेर पडले.

हिंदूतील उच्चवर्णीयांच्या त्या वृत्तीची डॉक्टरांना उबग आली. आपल्या पंचवीस वर्षांच्या राजकीय व सामाजिक जीवनात पुनः पुनः त्यांना तो अनुभव आला होता. त्यातूनच अनेक वर्षे त्यांच्या मनात घर करून बसलेला धर्मांतराचा विचार वर आला आणि मंत्रिमंडळातून बाहेर पडल्यावर हळुहळू मनी पक्का झाला आणि १४ ऑक्टोबर १९५६ रोजी आपल्या लक्षावधी अनुयायांसह डॉक्टरांनी बुद्ध धर्म स्वीकारला.

: नाना, दलितवर्गीयांवर अनादिकाळापासून चालत आलेला अन्याय आणि अत्याचार स्वातंत्र्यानंतर अगर

धर्मांतरानंतर नाहीसे झाले, निदान कमी झाले असे तुम्हाला वाटते का ?

: ठाशीव 'नाही' हेच माझे उत्तर. दलितवर्गीयांवरील अन्याय आणि अत्याचार नाहीसे होण्याची तर बातच सोडा, ते जराही कमी झालेले नाहीत; उलट ते वाढत्या प्रमाणावर घडत आहेत. फक्त अन्याय व अत्याचार करणारे आता बदलले आहेत पण जुलूम चालूच आहे. आर्थिक, सामाजिक व राजकीय अशा सर्व क्षेत्रात दलितवर्गीयांची आज पिळवणूक चालू आहे.

: स्वातंत्र्य आले. लोकप्रतिनिधींची सरकारे सर्वत्र आहेत असे असतानाही हे का चालू राहावे ?

: उत्तर मोठे विचित्र वाटेल तुम्हाला. पण बिवलकर, संख्याबलाच्या दृष्टीने पाहिले तर आजच्या राज्यकर्त्या जमातीला राजकीय सत्तेच्या दृष्टीने शह देऊ शकेल, जे पर्यायी राज्यकर्ते बनू शकतील अशी कुठली जमात असेल तर ती हीच दलितवर्गीय जमात नाही का ? 'एक दिवस आपल्याला या देशाचे राज्यकर्ते बनायचे आहे' असे डॉ. आंबेडकर म्हणत. हे भाकीत देववाणी मानतील ही माणसे. म्हणूनच घटनेप्रमाणे या देशात राजकीय, सामाजिक आणि आर्थिक समता उद्घोषित झाली असली तरी राज्यकर्त्यांच्या वागण्यावरून त्यांना ती आणणे मुळीच अभिप्रेत नाही हे स्पष्ट दिसत नाही का ? दलितवर्गीयांकरता जाहीर झालेल्या सर्व सवलती, आरक्षित जागा अनुदाने यांची सरकारच्या मागे तुणतुणे वाजवणाऱ्या दलित मंडळींवर खैरात केली जात आहे आणि चोच वासून बसलेल्या बहुतांश खऱ्या दलित–दरिद्री –भूहीन–सामान्य दलिताच्या चोचीत एक थेंबही पडत नाही ही वस्तुस्थिती नाही का ? आज या मंडळींचे ना आर्थिक उत्थान, ना सामाजिक सन्मान, ना राजकीय संरक्षण अशी स्थिती आहे. स्वातंत्र्य आले तरी आणि धर्मांतर केले तरी उच्चवर्गीय आणि शासनकर्ते त्यांच्याकडे वेगळ्या दृष्टिकोनातून पाहायला तयार नाहीत.

: मग नाना, या प्रश्नाचे उत्तर काय ? काही मंडळी म्हणतात की दलितवर्गीयांच्या निराळ्या वसाहती वसवाव्यात. जिथे ९०% दलित असतील १०% उच्चवर्णीय असतील तर त्यांना दलितांशी जमवून घ्यावे लागेल. अशा दलित वसाहतीबाबत तुमचे काय मत आहे ? यातून दलितांचे प्रश्न सुटतील ?

: बिवलकर, मला वाटते दलितांच्या वेगळ्या वसाहती करून, आर्थिक दृष्ट्या त्या स्वयंपूर्ण करूनही सामाजिक एकात्मता निर्माण व्हायची नाही. डॉक्टरांना ती आणायची होती. निराळ्या वसाहती केल्या तरी आजच्या बुद्धवाड्यांप्रमाणेच लोक या वसाहतीकडे पाहातील. मला वाटते दलितवर्गीयांना अनेक प्रकारची संरक्षणे देऊनच त्यांना आर्थिक दृष्ट्या प्रथम समर्थ केले पाहिजे. शिक्षण देऊन सामाजिक दर्जा प्राप्त करून द्यायला हवा.

: आजही सरकार हे करीत नाही का ?

: नाही. मी मघाशीच ते स्पष्ट केलेय्.

: सरकारने काय करायला हवे असे



# शिक्षण

आजच्या जगात शिक्षणाशिवाय तुमच्या
मुलाबाळांचा निभाव लागणार नाही.
उच्च शिक्षण—मग ते वैद्यकीय असो, अिंजिनियरिंग
असो कीं अितर कोणतंही तांत्रिक शिक्षण असो—
दिवसेंदिवस खर्चिक होत आहे. आजच योग्य ती
तरतूद केली नाही तर उद्या त्यांचा शिक्षण
खर्च भागवणं कठीण होअील.

आजच्या स्पर्धेच्या युगात मुलामुलींना
उच्च शिक्षण पाहिजेच. आयुर्विम्यानं त्याची
तरतूद करणं फार सोपं आहे.

आयुर्विमा योजनेचा फायदा अद्याप तुम्ही
घेतला नसेल तर आजच घ्या.
चांगली गोष्ट करायला मुहूर्त कशाला?

*आयुर्विम्याला पर्याय नाही !*

PRATIBHA-1510-13-MAR

तुमचे म्हणणे आहे.

: आज सरकार छोटी मोठी शेकडो धरणे बांधीत आहे. दलित वर्गीयापैकी ९९% लोक भूमिहीन शेतमजूर आहेत. यापैकी काही कुटुंबे नव्याने पाण्याखाली येणाऱ्या शेतीत वसवली का जाऊ नयेत? त्यांना जमिनी द्या. भांडवल पुरवा. बी बियाणे द्या. खते द्या. हवी ती अवजारे द्या आणि मुख्य म्हणजे खात्रीची जमीन मालकी द्या. हरित क्रांतीतून फक्त श्रीमंतांचेच उखळ पांढरे झालेय् ते थांबवा ना.

: पण सगळ्यांनाच जमिनी कशा मिळतील?

: सगळ्यांचा प्रश्न या रीतीने सुटेल असे माझे म्हणणेच नाही. त्यातल्या पुष्कळांना कृषिउद्योगात समावावे लागेल.

: कृषिउद्योगात कसे समावायचे?

: त्यांना भागिदार करा. कृषि-उद्योगाना औद्योगिक कायदे लागू करा. म्हणजे त्यांना गिरणी कामगारांप्रमाणे सर्व सुखसोई मिळतील. नोकरीची खातरी द्या. त्यांचे हितसंबंध जपण्याकरिता त्यांनीच निवडलेली मंडळे नेमून या मंडळींना योग्य वागणूक मिळते की नाही ते पाहा. प्रत्येक उद्योगाकरिता वेगळे बोर्ड नेमा. मला वाटते, दलित वर्गीयांकरिता काही करावे असे सरकारला खरेच वाटत असेल तर त्यांनी असे काही केले पाहिजे. उदाहरणार्थ, गेल्या २५-३० वर्षात दलित वर्गीयांच्या ज्या जमिनी उच्च वर्णीयांनी या नाही त्या कारणाने बळकावल्या आहेत. वा खरीदल्या आहेत त्या तरी त्यांना परत द्यायची त्वरित व्यवस्था करा. एवढे जरी केले तरी सरकार आपल्या घोषणांशी थोडे तरी प्रामाणिक आहे असे मी म्हणेन. पण हे होणे नाही–होणे नाही.

नाना गंभीर झाले. आत कुठेतरी 'सल' खुपतो आहे याची जाणीव त्यांचा चेहरा पाहून झाली. आयुष्यभर या माणसाने डॉक्टरांप्रमाणेच दुसरा कुठलाही ध्यास धरला नाही. आता आयुष्याच्या सायंकाळी ही रुखरुख त्यांना लागून राहाणे साहाजीकच होते.

गतवर्षी सरकारने त्यांना 'दलित-मित्र' केले. पन्नास वर्षापूर्वी दलितमित्र असणे म्हणजे सतीचे वाण होते. बहिष्काराला, नाडणुकीला, तोंड देणे होते. तेव्हापासून दलितमित्र असलेला हा माणूस–खोती गेली. शेती संपली. घरची 'लक्ष्मी' लंकेची पार्वती झाली तरी डगमगला नाही. सरकारने काय राखावी त्याच्या कार्याची बूज!

कागदाची आवराआवर करीत मी व प्राचार्य रामटेके उठलो.

: बरे आहे नाना. ७५ व्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा!

नाना भानावर आले.

: आभारी आहे–फार उशीर झाला नाही?

: वेळ कसा गेला हे समजले नाही?

: माझेही तसेच झालेय् हो. वयाची ७५ वर्षे संपली कशी ते कळलेच नाही. पण समोरचे प्रश्न संपले नाहीत. त्याचेच दुःख. पण सतत ३३ वर्षे डॉ. आंबेडकरासारख्या महापुरुषाचे सान्निध्य लाभले. भाग्यवान् नाही का मी?

: हेवा वाटतो नाना तुमचा. अच्छा. आम्ही उठलोच. ● ● ●

# जाळ्यात सापडलेला हेर

वसंत ज. डोळस

स्वित्झर्लंडच्या निसर्गाने नटून बसलेल्या दरीतील लुसर्न हे शहर अतिप्राचीन असल्यामुळे आधुनिकतेचे वारे तेथपर्यंत येऊन पोहचलेले नाहीत. मात्र तेथील निरागस निसर्गसौंदर्य लहानग्या मुलांप्रमाणं दिसतं. पहिल्या महायुद्धाच्या वेळी ब्रिटनच्या बऱ्याच गुप्तहेरांनी जर्मनीची रहस्यं मिळविण्यासाठी तेथे मुक्काम ठोकला होता.

आमशेन्डनला एका अलिशान हॉटेलात एक खोली मिळाली होती. तो बिछान्यावर पडल्या पडल्या सिगारेटचे झुरके घेत होता. अगदी इच्छित ठिकाणी येऊन पोचला होता तो. याच हॉटेलमध्ये त्याची शिकार होती. मात्र आपले भक्ष्य ते हेच का, याविषयी खात्रीलायक पुरावा अद्याप त्याच्या हाती पडला नव्हता. तो मनातल्या मनात पुटपुटला,

'घाई तरी कशाला करायची? जेवणाच्या वेळी सर्वांशी परिचय होईलच!'

आमशन्डनने हॉटेल–मालकिणीला स्वत:चं नाव 'सोमरविल' असे सांगितले होते. त्याच्या खिशातील पासपोर्टवर त्याचे नावही सोमरविलच दाखविण्यात आलं होतं. 'मला टायफाईड झाला होता आणि म्हणून हवापालट करण्यासाठी मी इकडे आलो आहे!' असं त्याने हॉटेल मालकिणीला सांगितले होते. त्याचप्रमाणे त्याने येथे आपण जर्मन भाषा शिकणार आहोत. कारण मी सेन्सार विभागात काम करणारा एक कर्मचारी आहे, असेही सांगितले होते.

झोप झाल्यावर तो उठला व खाली जेवणासाठी मांडलेल्या टेबलाजवळ येऊन बसला. कॉफीचा घोट घेत तो हॉटेल–मालकिणीला म्हणाला, 'मी इथे जर्मन भाषा शिकणार आहे, हे मी मागेच आपणाला सांगितले आहे. जर्मन भाषा शिकविणारी एखादी तरी शिक्षिका आपल्याला मिळाली की, नाही?'



आमशेन्डनला पूर्ण कल्पना होती की, ही हॉटेल-मालकीण सर्वांच्या कानावर ही गोष्ट घालील. आणि त्याला हेच हवे होते.

हॉटेल-मालकिणीला युद्धाबद्दल अतिशय तिरस्कार वाटत होता. कारण युद्धामुळे तिचा हॉटेलचा धंदा एकदम बसला होता. हॉटेल-मालकीण म्हणाली,

'हॉटेलमध्ये लोक तरी किती आहेत? एक तुम्ही, एक आयरिश जोडपे, आणि एक ब्रिटिश माणूस व त्याची जर्मन-पत्नी. या ब्रिटिश माणसाला त्याची पत्नी जर्मन म्हणून नाईलाजाने या तटस्थ देशात आश्रय घ्यावा लागला आहे!'

केपर! ग्रॅंटले केपर. ब्रिटनचा देशद्रोही नागरिक-आणि जर्मनीचा एक हेर. हाच तो ग्रॅंटले केपर की, ज्याच्यासाठी आमशेन्डन येथे आला आहे. हॉटेल मालकीण तेथून निघून गेल्यावर आमशेन्डनही आपल्या खोलीत परतला.

संध्याकाळचे सात वाजले-जेवणाची घंटा झाली. सर्व लोक भोजनगृहात जमू लागले. आयरिश जोडपे आले होते. आमशेन्डन दरवाजाकडे तोंड करून बसला होता. कारण त्याला त्या देशद्रोही माणसाचे दर्शन घ्यावयाचे होते.

इतक्यात ग्रॅंटले दम्पतीने आत प्रवेश केला. आमशेन्डन तोंडापुढे जर्मन भाषेतील एक पुस्तक घेऊन बसला होता. व वाचनात गढून गल्याचा अभिनय करीत होता. केपर खुर्चीवर येऊन बस-

ताच, आपण दिवसभरात कुठे, कुठे भटकलो हे तो आपल्या पत्नीला सांगत होता. त्याच वेळी जेवण आले. ग्रँटले आपल्या पत्नीच्या कानात काही तरी कुजबुजला, त्याने आमशेन्डनकडे तिरपा दृष्टीक्षेप टाकला. आणि त्याच्यासंबंधी त्याने आपल्या मोलकरणीजवळ काही तरी पृच्छा केली.

केपर आपल्याच संबंधी विचारपूस करीत असावा याची पुरेपूर कल्पना आमशेन्डनला आली.

केपर हॉटेलमध्ये उतरणाऱ्या प्रत्येक गृहस्थाकडे संशयी दृष्टीने पाहत होता. आमशेन्डनने आता आपलं चित्त पुस्तकात खुपसलं होतं. तरी देखील केपरच लक्ष आपल्यावरच केंद्रित झाल्याचे त्याला पुरेपूर जाणवत होते.

जेवण झाल्यावर तो आपल्या खोलीत गेला. आणि हॅट उचलून फिरण्यासाठी बाहेर पडला. हॉटेलच्या व्हरांड्यात केपर जोडपे हॉटेल मालकीणीबरोबर कुजबुज करीत उभे होते. अर्थात ही कुजबुज आपल्याच संदर्भात असावी हे त्याच्या चटकन लक्षात आले.

पासपोर्टवरील माहितीप्रमाणे केपरचे वय ४२ वर्षे दाखविण्यात आले होते. त्याचा जन्म बर्मिंघममध्ये झाला होता. अकरा वर्षांपूर्वी तो एका जर्मन तरुणीबरोबर विवाहबद्ध झाला होता.

केपर प्रथम बर्मिंघमच्या बार कौन्सिलमध्ये काम करीत होता. नंतर तो वर्तमानपत्राच्या क्षेत्रात एक पत्रकार म्हणून उतरला. पुढे अफरातफरीच्या प्रकरणावरून त्याला कारावासाचीही शिक्षा ठोठावण्यात आली. नंतर लंडनला परतल्यावर तो निर्यात व्यवसायात उतरला. पण त्याचे त्यांत दिवाळे निघाले. नंतर परत तो वर्तमानपत्राच्या क्षेत्रात उतरला. पुढे युद्ध सुरू झाल्यावर तो नौदलात काम करू लागला. आपली पत्नी जर्मन असल्यामुळे तो जिनेव्हाकडे आला—जेव्हा इटाली युद्धात उतरला—तेव्हा नोकरी सोडून तो स्वित्झर्लंडमध्ये आला.

ब्रिटनच्या गुप्तचर विभागाकडे केपरची माहिती उपलब्ध होती. केपर जर्मनीसाठी हेरगिरी करीत होता. आणि त्या कामाबद्दल त्याला महिन्याला ४० पौंड मोबदला मिळत होता. स्वित्झर्लंडमध्ये राहून जर त्याने जर्मनीसाठी हेरगिरी केली असती तर ब्रिटनच्या गुप्तचर खात्याने त्याच्याकडे ढुंकून देखील पाहिले नसते. परंतु त्याने असे एक भयंकर कृत्य केले होते की त्यासाठीच ब्रिटिश गुप्तचर विभाग त्याचा काटा काढण्यासाठी कार्यरत झाला होता. त्याचे असे झाले—

ब्रिटिश गुप्तचर विभागात एक स्पॅनिश माणूस—गोमेज—झुरिकमध्ये राहून ब्रिटनसाठी हेरगिरी करीत होता.

केपरने गोमेजची ओळख करून घेतली. आणि त्याच्याबरोबर संबंधही वाढविले. गोमेजला वाटले—केपर हा हाडामासाचा ब्रिटिश माणूस आहे; तो आपल्या देशाचा विश्वासघात करणार नाही. त्या विश्वासातून गोमेजने आपण कोण आहोत, कोणासाठी हेरगिरी करीत आहोत. हे सारे इत्थंभूत केपरला

सांगून टाकले.

ग्रँटले केपरने गोमेजने सांगितलेली सर्व हकिगत काळजीपूर्वक ऐकून घेतली आणि आपल्या देशाची व गोमेजची अजिबात पर्वा न करता, गोमेजने सांगितलेली सर्व हचिगत त्याने लगेच ट्रान्समीटरवरून जर्मन गुप्तचर विभागाला कळविली.

त्याच्या या संदेशाचा परिणाम व्हायचा तोच झाला. जर्मन गुप्तचर विभागाने लगेच गोमेजचा काटा काढला. जेव्हा गोमेज जर्मन गुप्तचरांच्या जाळ्यात सापडला तेव्हा ब्रिटनची रहस्ये मिळविण्यासाठी त्याचा अतोनात छळ झाला. तरी देखील गोमेजने तोंड उघडले नाही. अखेरपर्यंत तो ब्रिटनशी एकनिष्ठ राहिला व त्यासाठी मरणालाही सामोरा गेला होता.

लंडनवरून आपल्या कामगिरीवर निघताना आमशेन्डनने आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना विचारलं, " केपर आपण होऊन कशाला फासाचा दोर गळ्यात अडकवून घेईल ?"

तेव्हा कर्नल म्हणाले, ' त्याला फाशी ऐवजी कुत्र्याप्रमाणे गोळ्या घालू. तुम्ही आपल्या कामगिरीवर जा. केपर पेक्षाही तुम्ही अधिक बुद्धीमान आहात. तुम्ही फक्त त्याला आमच्या हवाली करा. पुढचं आम्ही पाहून घेऊ !"

त्यामुळे केपरला लंडनला जाण्यासाठी तयार करणे ही कामगिरी आमशेन्डनवर येऊन पडली होती. पण परिस्थितीनेच त्याची कामगिरी सोपी केली. मला जर्मन भाषा शिकविण्यासाठी शिक्षिका पाहिजे ' हे त्याने अगोदरच हॉटेल मालकिणीच्या कानावर घातले होते. व तिने ते सगळीकडे पसरविले होते. केपर पती-पत्नीच्या देखील कानावर तिने ही गोष्ट घातली होती. त्याबरोबरच सोमरविल हे सेन्सार विभागात काम करतात व शरीरस्वास्थ्यासाठी ते इकडे आले आहेत. हेही सांगून टाकले होते.

हे सारे सांगून टाकण्यामागे आमशेन्डनचा डाव होता. काहीही करून त्याला केपरला लंडनला जाण्यास तयार करावयाचे होते. शिवाय युद्धकालीन परिस्थितीत आपल्याच फायद्यासाठी जर्मन अधिकारी देखील केपरला संमती देतील असा त्याला विश्वास वाटत होता. शिवाय लंडनच्या सेन्सार विभागात नोकरी देण्याचे आमीष दाखवून देखील त्याला जाळ्यात पकडता येणे शक्य होते.

तशात केपर पती-पत्नी चांगल्याच विकट परिस्थितीत सापडले होते. कारण त्यांच्या वरिष्ठ जर्मन अधिकाऱ्यांना देखील केपरने ब्रिटनला आपल्या मायदेशी जाऊन ब्रिटनचे गुपित जर्मनीला कळवावे, असे वाटू लागले होते.

त्यामुळेच आमशेन्डनची माहिती कळल्यापासून केपर त्याच्याशी ओळख करून घेण्याच्या प्रयत्नात होता. त्याची पहिली पायरी म्हणून स्वतःच्या पत्नीला त्याला जर्मन भाषा शिकविण्याचे काम करू देण्यास देखील त्याची संमती होती.

दुसऱ्या दिवशी आमशेन्डन कॉफी घेत खाली व्हरांड्यात बसला होता. ते

पाहून केपरने आपल्या बुलेटियर कुत्र्याला मोकळे सोडले. कुत्रा उड्या मारीत मारीत शेवटी आमशेन्डनच्या छातीजवळ पोहचला. ओळख करून घेण्याचा हा एक मार्ग होता. एक हेर दुसऱ्या हेराला आपल्या जाळ्यात पकडण्याच्या प्रयत्नात होता.

"माफ करा हं, मि. सोमरविल !" केपर नम्रतेने म्हणाला,

"काही हरकत नाही. फारच छान कुत्रा आहे. तुमचा. या बसा !"—

केपर लगेच आमशेन्डन जवळ येऊन बसला. एकमेकांचा परिचय झाला. मग बोलण्याच्या ओघात अगोदर हॉटेल मालकिणीला सांगितलेलीच सर्व हकिगत त्याने केपरला सांगून टाकली. बोलण्याच्या ओघात केपरने स्वतःबद्दलची सर्व हकिगत आमशेन्डन उर्फ सोमरविलला सांगून टाकली. फक्त आमशेन्डनला त्याने एक गोष्ट सांगण्याचे टाळले की, तो जर्मन हेर आहे !"

श्रीमती केपरही वरून खाली आल्या. केपरने आमशेंडनची आपल्या पत्नीबरोबर ओळख करून दिली. लगेच ठरले की, श्रीमती केपर सोमरविल यांना त्यांच्या खोलीत रोज अकरा वाजता जाऊन एक तासभर जर्मन भाषा शिकवतील आणि एक तासाची शिकवणी म्हणून सोमरविल रोज त्यांना दहा फ्रँक देतील.

दुसऱ्या दिवसापासून सोमरविलची शिकवणी सुरू झाली, साहित्य, व्याकरण इथपर्यंतच शिकवणी सीमित होती. युद्ध किंवा राजकारणावर आमशेंडन उर्फ सोमरविल विचारू लागताच, लगेच श्रीमती केपर तो विषय टाळीत असे.

आमशेंडन केपरशी असलेले संबंध घनिष्ट होण्यासाठी त्याला जास्तीत जास्त संधी देत होता. एकदा विषयाला हात घालण्यासाठी आमशेंडनने विचारले,

"हा कुत्रा आपण कधी विकत घेतला ?"

"पहिले महायुद्ध सुरू होण्यापूर्वी १९१४ मध्ये. आपण माझ्या देशबांधव


# पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नानंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यांत यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणास त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतला आहे. आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगमुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

**प्रेम ट्रेडिंग कंपनी (S. N.) M. पो. कतरीसराय (गया)**

आहात. युद्धाचे वारे कोणाकडे वहात आहे? या विषयावर मी माझ्या पत्नी-बरोबर चर्चा करीत नाही. कारण ती जर्मन आहे!"

आणि मग गंभीर होऊन आमशेंडनने काही सर्वांनाच माहित असलेल्या गोष्टी एखाद्या गुप्त गोष्टीसारख्या केपरला सांगितल्या. कारण आमशेंडनला पूर्ण कल्पना होती की, आपण सांगितलेली माहितीही उद्या दिवस उगवायच्या आत केपर जर्मनांना कळवील.

आणखी काही दिवस उटलले. एके दिवशी शिकवणी घेताना आपले पती जिनेव्हाला गेल्याचे सांगितले.

आमशेंडन लगेच विचार करू लागला. केपर जिनेव्हाला नाही. बर्नलाच गेला असेल. याची खातरजमा करण्यासाठी त्याने केपरच्या मोलकर-णीलाच गाठले व विचारले,

"तुझे काय आता कमी झाले असेल नाही?" त्यावर मोलकरीण लगेच म्हणाली,

"होय, कारण केपर बर्नला गेले आहेत!"

त्याला लगेच आपल्या एका स्वीस मित्राची आठवण झाली. तो आमशेंडनची छोटी मोठी कामे काळजी-पूर्वक करीत असे. त्याने लगेच एक पत्र लिहिले व पत्र देऊन लगेच आपल्या स्वीस मित्राला बर्नलाच पाठविले. बर्न येथील त्याच्या हेरांनी केपरच्या हालचालींवर लक्ष ठेवावे, यासाठी ही दक्षता होती.

दुसऱ्या दिवशी केपर परत आला. जेवणानंतर केपर दंपती आपल्या खोलीत निघून गेली.

त्यांच दिवशी आमशेंडनला बर्नहून संदेश आला. त्यात म्हटले होते की, 'येथे केपर जर्मन गुप्तचर खात्याचे अधिकारी मेजर बान याला भेटला. मेजर बानने त्याला लगेच लंडनला जाण्यास सांगितले आहे!"

संध्याकाळी ग्रँटले केपर आमशेंडनच्या खोलीत गेला व त्याला म्हणाला,

"मी जिनेव्हाला गेलो होतो!"

"तुम्ही तिकडे गेल्याचे कळले होते मला!"

"चला खाली. माझ्या पत्नीचे डोके दुखत आहे. आपण तिघेही कॉफी घेऊ. मी स्वदेशी लंडनला परतण्याचा विचा-रात आहे. म्हणून ती बेचैन झाली आहे!"

', आपण जास्त दिवस लंडनला राहणार आहात काय? मला पण चुकल्यासारखे वाटेल!"

"होय. सध्या आपला देश फार मोठ्या संकटात आहे. अशावेळी मी देखील माझं कर्तव्य बजावायला हवं. नाहीतर माझे देश बांधव मला काय म्हणतील?"

"आपण श्रीमती केपरला पण घेऊन जाणार काय?"

"नाही. ती इथेच राहील. पण तेथे जाऊन मी लगेच काय करणार? आपण सेन्सार विभागात नोकरी मिळ-विण्यासाठी आपलं शिफारसपत्र मला द्याल का?"

" हो, जाते वेळी माझं शिफारसपत्र घेऊनच जा !"

नंतर तिघे उठले-केपर जाण्याच्या तयारीला लागला. आमशेन्डन आपल्या खोलीत गेला आणि त्याने काही पत्रे लिहिली. पहिले पत्र ब्रिटनच्या गुप्तचर विभागाचे वरिष्ठ अधिकारी कर्नलला लिहिले. त्यात केपरचा लंडन-मधील सर्व कार्यक्रम होता. दुसरे पत्र केपरला व्हिसा व पासपोर्ट लवकरात लवकर मिळावा. या संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांना लिहिले होते.

शिकार आपण होऊन जाळयाच्या रोखाने चालली होती.

आमशेन्डनचे शिफारस पत्र घेऊन तिसऱ्या दिवशी केपर लुसर्न सोडून लंडनकडे निघाला.

आमशेन्डनवर सोपविलेली कामगिरी अशा रीतीने जवळ जवळ पूर्ण झाली होती. परंतु तरी देखील कर्नलचा आदेश मिळेपर्यंत तो तेथेच थांबला.

तीन चार दिवसांनी आमशेन्डनला संदेश आला की, केपर फ्रान्सकडे रवाना झाला आहे.

श्रीमती केपर आपल्या पतीची रोज प्रतीक्षा करीत होती. कारण आपल्या जर्मन देशबांधवांना ब्रिटनची गुपिते पुरविणारी ती एक महत्त्वाची व्यक्ती होती.

पुढे-पुढे आमशेन्डनची शिकवणी बंद करून श्रीमती केपर दिवसच्या दिवस खोलीत बसून केपरची वाट पाहण्यात घालवू लागली.

ग्रँटले केपरला ब्रिटनच्या गुप्तचर विभागाने कुत्र्याप्रमाणे गोळ्या झाडून ठार केलं आणि गोमेजच्या खुनाचा वदला घेतला.

● ● ●

---


**यंदाचे महाराष्ट्र राज्य ग्रंथ-पारितोषिक मिळवणारे**

**आमचे एक विशेष प्रकाशन**

**डॉ. सुधीर फडके**

# कोठे आणि कधीतरी

**किंमत : दहा रुपये**

**राजहंस प्रकाशन**

# हवाई टाळेबंदी

पृष्ठ २ वरून

ठेवून होता. नेहमीचा माहितीचाच असल्याने, फोनवरील बोलणं आटोपताच त्यानं मला हटकलं. 'काय हो, काय गडबड आहे इंडियन एअरलाईन्समध्ये? कुठे जायचंय वाटतं विमानानं ?'

'जायचं वगैरे नाही कुठे; पण तिथल्या टाळेबंदीची माहिती घ्यायचा प्रयत्न करतोय.'

'तिथेही टाळेबंदी ? कमाल आहे !'

पुढे बोलण्याच्या ओघात समजलं की, टाळेबंदी पुकारून तीन दिवस होऊन गेले होते, तरीही त्या मालकाला त्याची काहीच कल्पना नव्हती आणि विमानं चालतात की बंद राहतात त्याची त्याला तमाही नव्हती !

थोडया वरच्या आर्थिक श्रेणीत वावरणाऱ्या मुंबईतील सर्वसामान्य 'II Grade' हॉटेल मालकाची इंडियन एअरलाईन्समधल्या संपाबद्दलची ही प्रतिक्रीया होती. त्याची उदासीनता ध्यानात येण्यासारखी होती. बाकीच्या सर्वसामान्य जनतेला तर ह्या टाळेबंदीचं, तिथल्या कर्मचाऱ्यांच्या गाऱ्हाण्यांचं सोयरसुतक दिसत नव्हतं !

'विमानं चालतात, रात्रीची झोप मोडीत आकाशात उडतात. बडी माणसं त्यातनं येतात, जातात...पेपर्समधून वाचायला मिळतं म्हणून कळतं, ह्या लोकांची गाऱ्हाणी आहेत. आम्हाला दिसतं ते त्यांचं जीवन विलासी असतं... आमच्या जीवनाहून पार वेगळं... तिथल्या लोकांच्या कहाण्या ऐकू येतात त्या भल्या मोठमोठ्या पगारांच्या, उंची कपडयालत्त्यांच्या, जीन-रम-व्हिस्कीच्या, दिल्ली-कलकत्त्यातल्या कॉलगर्ल्सच्या ! आज लॉकआऊट आहे म्हणतात, पण त्या नगरीतनं येणाऱ्या बातम्या आजही ह्याच आहेत...' कालिना चर्चच्या बस-स्टॉपवर तिथलेच एक रहिवासी श्री. मधू. साळवी हवाई नगरीमधल्या हवाई-रंगीन कहाण्या मला सुनवीत होते. त्यांच्याच मते, 'इथल्या कनिष्ठां-तल्या कनिष्ठांचे पगारही बाहेर मिळणाऱ्या पगारांपेक्षा दुपटी-तिपटीने अधिक आहेत...बाहेरच्या जगात जीवनावश्यक गरजा भागविण्यासाठी पगार कमी पडतात, इथे चैनीवर उधळण्यासाठी कदाचित पगार कमी पडत असावेत...आणि तरीही इथले कर्मचारी सदान्कदा ओव्हरटाईमवरच असतात. वस्तुस्थिती अशी आहे की, ओव्हरटाईम सपूर्ण बंद झाला तरी ह्या कर्मचाऱ्यांचं फारसं काहीच बिघडणार नाही...कामाचे तासही इतरत्रच्या मानाने खूपच कमी आणि तरीही इथे झगडे सारखे चालू असतात...'

आजुबाजूच्या नागरिकांकडून ज्या काही मोजक्या प्रतिक्रीया ऐकायला मिळाल्या त्यातली, श्री. मधू साळवी ह्यांची बरीच बोलकी होती. इतरही प्रतिक्रीया थोडया फार अशाच होत्या. तिथल्या कर्मचाऱ्यांविषयी तक्रारी मांडणाऱ्या ! अर्थात ह्यातल्या एकाचाही प्रत्यक्ष हवाई वहातुकीशी कधीच संबंध

आलेला नव्हता. कालिना-सांताक्रूझ दरम्यानच्या 'एअर इंडिया' व 'इंडियन एअरलाईन्स' ह्या दोन कंपन्यांच्या वसाहतीच्या आजुबाजूच्या परिसरात इतपत तरी प्रतिक्रीया ऐकायला मिळाल्या.इतरत्र तर उल्हासच होता! साहजिकच, इंडियन एअर-लाईन्सचे व्यवस्थापक आणि कर्मचारी ह्यांच्या झगड्यात फारसं स्वारस्य कुणालाच नव्हतं एवढं मात्र जाणवलं! देशातल्या बहुसंख्य जनतेचं ह्या झगड्यात कसलंही स्थान नाही. विमाने उडली काय, न उडली काय, त्यांना त्याची फिकीर नव्हती. अर्थातच, टाळे-बंदीमुळे ज्या कर्मचाऱ्यांवर परिणाम होणार, त्यांच्याविषयीही कसलीच जाणीव कुठेही आढळली नाही.

आणि गंमत ही की हवाई वहातूक बंद पडल्याने ज्या वर्गाला रेल्वेकडे वळावे लागले त्या वर्गातल्या लोकांनाही कर्मचाऱ्यांविषयी प्रेम वाटले नाही की लॉक-आऊटविषयी दुःख जाणवलं नाही. फोर्टमधल्या एका 'पॉश' ऑफिसमध्ये ह्याची प्रचिती जाणवली. हैद्राबादला नेहमी विमानांनी जाणारे तीन-चार कंपन्यांचे एक डायरेक्टर (नाव जाहीर केलं जाऊ नये ही विनंती त्यांचीच!) मला म्हणाले– 'Naturally I shall be going by Railway and then I am atleast definite about my boarding a train and leaving Bombay...' अर्थातच मी आता रेल्वेने जाणार आणि त्यामुळे निदान मला एक तरी निश्चिती आहे की मी गाडीत बसून मुंबई सोडणारच!')

'...अलिकडे इंडियन एअर-लाईन्सच्या विमानांवर अवलंबून राहून हैद्राबादेतले कार्यक्रम इथून ठरवणं मला फार धोक्याचं वाटू लागलं होते. वेळेवर तर राहूच द्या, पण विमान ऐनवेळी रद्दच होणार नाही ह्याची हमीच कधी कुणी देऊ शकत नसे.'

अशाच तक्रारी मला अनेक विमान-प्रवाशांनी ऐकवल्या. कर्मचाऱ्यांच्या उद्धटपणाच्या तक्रारींचीही जंत्री अर्थातच ऐकायला मिळाली. एकानं, इंडियन एअर लाईन्सची एकूणच यंत्रणा मुळा-पासून ढवळून निघाल्याशिवाय, इंडियन एअरलाईन्सच्या वहातुकीत फरक पडणार नाही असे ठामपणे सांगितले. 'Air India' कडेच 'Indian Airlines' चं व्यवस्थापन सुपूर्द करावे असेही एकाने सुचवले. 'Air India' व 'Indian Airlines' ह्या दोन सरकारी विमान वहातुकीच्या कर्म-चाऱ्यांमधल्या विषमतेमुळे 'इंडियन लाईन्स'वर अनेक वेळा गोंधळ उडतो असे त्याचे प्रतिपादन! पण एका-बाबतीत मात्र सर्वांचे एकमत दिसले– 'ह्यावेळी शासनाने कडक धोरण स्वीकारायला हवे. इंडियन एअरलाइन्स-मधल्या सर्व झगड्यांवर कायम उपाय शोधून काढून प्रवाशांचे हाल संपवले पाहिजेत. थातुर मातुर उपायांनी तात्पुरत्या डागडुजीचा अवलंब करून प्रवाशांचे हाल वाढवायचे टाळले पाहिजे.'

इंडियन एअर लाईन्सचे मुख्य व्यव-

स्थापक एअर चीफ मार्शल लाल व शासनाचे वतीने हवाई-वहातूक मंत्री श्री. राजबहादूर ह्यांनी केलेल्या वक्तव्यावरून 'इंडियन एअरलाईन्स'-च्या व्यवस्थापकांनी ह्यावेळी कडक धोरण अवलंबायचे ठरवले आहे असे दिसते. टाळेबंदी जारी करण्याआधी ह्या दोघांनी १२ नोव्हेंबर, १९७३ रोजी नवी पाळी-पद्धत अंमलात आल्या. दिवसांपासून कर्मचारी संघटनांशी बोलणी करण्याचा नेटाचा प्रयत्न केला. लोकसभेला विश्वासात घेऊन बहुसंख्य खासदार मंडळींचा (ह्यात विरोधी खासदारही आहे!) पाठींबा व्यवस्थापक मंडळाला मिळवला. त्यामुळे व्यवस्थापकांच्या आजच्या निर्णयांना फारसा विरोध कुठे जाणवलाच नाही. उलटपक्षी, कर्मचारी संघटणांचे अडवणूकीचे धोरण वेळोवेळी उघडे होऊन त्यांना मिळणारी सहानुभूती मात्र साफ कमी झाली आहे. 'टाळेबंदी' काळात, सर्वांच्या नोकऱ्यांची हमी देऊन, वाटाघाटींचे दरवाजे मोकळे ठेवून संचालकांनी बाजी मारली आहे. नवीन पाळी पद्धती किमान काही दिवस तरी प्रयोग म्हणून हाताळली जावी, प्रयोग फसला तर तिचा पुनर्विचार करता येईल अशी बरीचशी लवचिक भूमिका संचालकांनी स्वीकारली आहे. ह्या नव्या पद्धतीमुळे विमान वहातूकीची क्षमता किमान दहा टक्क्यांनी तरी वाढेल, वहातूकीत नियमितता येईल. काटकसर वाढेल असा संचालकांचा दावा आहे. ह्या दाव्यामुळे अर्थातच शासन व्यवस्थापकांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. आणि शासनाच्या पाठिंब्यामुळे व्यवस्थापक आपल्या भूमिकेवरून तसूभरही हलायला तयार नाहीत.

नवीन पाळीपद्धतीमुळे कर्मचाऱ्यांना त्रास होईल, त्यांचे कामाचे तास वाढतील, वगैरे आरोप व्यवस्थापकांनी खोडून काढले आहेत. कामाचे तास पूर्वीप्रमाणेच ४१॥ राहतील हेही कंपनीने स्पष्ट केलं आहे. नवीन पद्धतीमुळे उपलब्ध क्षमतेचा मोठ्या प्रमाणात वापर करून घेतला जाणार असल्यामुळे कर्मचाऱ्यांच्या ओव्हरटाईममध्ये कदाचित् काही कपात होईल हे मात्र व्यवस्थापक मान्य करतात. 'परंतु हा ओव्हरटाईम नवीन पद्धतीमुळे अनावश्यक ठरत असल्यास तेवढा पैसा वाचवून कंपनीचा फायदा वाढविणं हे व्यवस्थापकांचं कार्यच ठरतं... The problem therefore is whether the Management is to be allowed to Manage or otherwise?...'

ह्या संदर्भात इंडियन एअर लाईन्समध्ये १९७२-७३ या आर्थिक वर्षात, चार कोटी रुपयांच्या आसपास रक्कम ओव्हरटाईमपायी वाटली गेली हे मुद्दाम नमूद केलं पाहिजे! ह्याशिवाय इथल्या कर्मचाऱ्यांची वेतनश्रेणी जागतिक पातळीपेक्षा काहीच कमी नाही.

एवढे प्रचंड पगार, अरेरावी वर्तणूक तरीही कर्मचाऱ्यांच्या अडवणुकीपायी विमान वहातूकीतली अनिश्चितता — विमान-प्रवासी मंडळी वहातूक कर्म-

चाऱ्यावर खूश नसावीत हे उघडच! ह्या प्रवाशांची खप्पा मर्जी, सामान्य जनतेची संपूर्ण उदासीनता, मॅनेजमेंटची कणखर भूमिका, त्या भूमिकेला तेवढाच भक्कम शासनाचा पाठिंबा ह्या साऱ्यामुळे इंडियन एअरलाईन्सच्या कर्मचाऱ्यांची परिस्थिती मात्र चमत्कारिक झाली आहे. सर्वांत महत्त्वाचं म्हणजे त्यांना कुणाचीही सहानुभूती नाही. स्वतःच्या ताकदीवर ह्या संघटना किती झगडू शकतात हे पाहाण्यासारखं आहे. इंडियन एअरलाईन्समध्ये एकूण १६००० कर्मचारी आहेत. एअर कॉर्पोरेशन एम्प्लॉईज युनियन आणि इंडियन एअरक्राफ्ट इंजिनियर्स असोसिएशन ह्या दोन महत्त्वपूर्ण संघटना ह्यांतल्या बहुसंख्य कर्मचाऱ्यांचं नेतृत्त्व करतात. इंडियन एअरक्राफ्ट टेक्निशियन्स असोसिएशन ही तिसरीही संघटना अस्तित्वात असून सुमारे ३००० तंत्रज्ञ तिचे सभासद आहेत. ह्या संघटनांनी लॉक-आऊटच्या दुसऱ्याच दिवशी व्यवस्थापकांशी बोलणी करून व्यवस्थापकांच्या नव्या पाळीपद्धतीचा प्रायोगिक स्वरूपात अवलंब करून पाहाण्याला मान्यता दिली आहे. निदान त्याप्रमाणात तरी, कर्मचाऱ्यांविरुद्ध विजय प्राप्त करून व्यवस्थापकांनी आपली बाजू निश्चतच बळकट करून घेतली आहे. तेवढीच कर्मचाऱ्यांची दुबळी झाली आहे हेही निश्चित!

एअरक्राफ्ट इंजिनियर्स ॲसोसिएशनच्याही सुमारे ८०% कर्मचाऱ्यांना ओव्हरटाईम मिळतच नाही. साहजिकच आज जरी हे इंजिनियर्स मॅनेजमेंटविरुद्ध उभे असले तरी, त्यातल्या अनेकांना हा संप नको होता असंच मला आढळून आलं.

कॉर्पोरेशन एम्प्लॉईज युनियनचा मात्र नव्या पाळी पद्धतीस कडाडून विरोध आहे. आणि त्याचं मुख्य कारण आर्थिक म्हणजे ओव्हरटाईममधली कपात हेच आहे. नव्या पद्धतीमुळे कामाच्या तासात ४१ वरून ५४ तास एवढी वाढ होते असा त्यांचा दावा आहे. ही वाढ कशी होते हे मात्र ते सांगू शकले नाहीत. आता चालू मोसम आहे परदेशी पाहुण्यांच्या भारतभेटीचा. ह्या वेळी ओव्हर टाईम बहुधा जास्त मिळतो. परंतु नेमक्या त्याचवेळी ही नवीन पाळी पद्धत झाल्यामुळे हे कर्मचारी बिथरले असावेत.

ह्या बिथरण्यातूनच कर्मचाऱ्यांचं अलिकडचं आंदोलन उभं राहिलं आहे. १२ नोव्हेंबर १९७३ रोजी ह्या नवीन पाळी पद्धतीचा अवलंब केला गेला आणि तेव्हापासूनच ताज्या असंतोषाला सुरुवात झाली. कामात असहकार सुरू झाला, विमानं कित्येक तास उशीरा सुटू लागली, तर काही रद्द होऊ लागली. वहातूक पार विस्कळीत होऊन गेली. त्यातच २५ नोव्हेंबरपासून कर्मचाऱ्यांनी ह्या पाळीपद्धतीविरुद्ध बेमुदत संपाची नोटीस दिली. परंतु संप सुरू व्हायच्या आदल्याच दिवशी अत्यंत नाट्यपूर्ण पद्धतीनी व्यवस्थापकांनीच 'टाळेबंदी' जाहीर करून संभाव्य संप होऊच दिला नाही. आज पाच दिवस ही टाळेबंदी सुरू आहे. १६००० कर्म-

चारी घरी बसले आहेत. एअर इंडिया, जमैर आणि सफारी या दोन खाजगी कंपन्या, मद्रासच्या 'हिंदू' दैनिकाची विमानं ह्यांचा उपयोग करून काही जुजूबी हवाई सेवा तूर्त चालवल्या जात आहेत. टपाल वाटपासाठी इंडियन एअर फोर्स (हवाई दलाच्या) विमानांचा उपयोग करून घेतला जात आहे. रेल्वेवर पहिल्या वर्गाचे जादा डबे जोडून 'वडचा' प्रवाशांची सोय करून दिली जात आहे! आणि ह्या धामधुमीत इंडियन एअर लाईन्सची बहुतांश विमानं जागोजाग पडून आहेत...

इंडियन एअरलाईन्समध्ये गेल्या दोन वर्षांतली ही दुसरी टाळेबंदी. पण ह्या दोन टाळेबंद्यांच्या मधल्या काळातही व्यवस्थापक व कर्मचारी ह्यांच्यात धुसफूस सुरूच होती. ह्या दोन वर्षात अनेक आर्थिक मागण्याही कर्मचाऱ्यांनी पदरात पाडून घेतल्या होत्या. त्या बदलात कामगारांच्या वेळांच्या पद्धतीत, कामाच्या सोयीच्या दृष्टीनी बदल करून घ्यायचे हक्क व्यवस्थापकांनी मिळवले होते. त्याच अनुषंगाने हे बदल केले गेले आहेत व ते कर्मचाऱ्यांना त्रासदायक ठरणार नाहीत असा संचालकांचा दावा आहे. कर्मचाऱ्यांच्या कामाच्या वेळा ठरविण्याचाही किंवा तासांच्या चौकटीत राहून वेळा बदलण्याचाही हक्क मॅनेजमेंटला मिळू शकला नाही तर मॅनेजमेंटला देशाच्या ह्या वहातूक व्यवस्थेला वळण लावणंच शक्य होणार नाही हा मॅनेजमेंटचा दावा आहे.

व्यवस्थापकांच्या ह्या दाव्यात बरेच तथ्य आहे. 'इंडियन एअरलाईन्स' हा अंतर्गत वहातूक करणारा एकमेव राष्ट्रीय उद्योग. विशिष्ट आब राखून तो फायद्यात चालावा ही सर्वसामान्य अपेक्षा. परंतु गेल्या काही वर्षांतल्या कर्मचारी-व्यवस्थापक झगड्यात ह्या राष्ट्रीय उद्योगाची हेळसांडच चालू आहे. कार्यक्षमता किमान साठ टक्क्यांनी घटली आहे. कर्मचाऱ्यांच्या पगारात, गेल्या दोन वर्षातल्या विविध करारांनुसार, किमान २० ते २५ % वाढ झाली आहे. परंतु त्याच काळात, निष्काळजीपणामुळे घडलेल्या अपघातांचे प्रमाण वाढले आहे. १९६७–७० च्या काळात एकूण विमानोड्डाणांपैकी एकपंचमांश किंवा त्याहूनही कमी उड्डाणे अनियमित असत. हा अनियमितपणा देखील उपेक्षणीय नव्हता. पण आज किमान निम्मी उड्डाणे तरी अनियमित होतातच होतात. एखादे काम इंजिनियर्स व कर्मचाऱ्यांवर सोपवल्यावर, काही विशिष्ट कालावधीत ते पूर्ण व्हावं अशी अपेक्षा असते. ह्या अपेक्षेपेक्षा एखाद दोन दिवस उशीर झाला तर तेही क्षम्य असते. परंतु अपेक्षेपेक्षा अशी कामे संपवण्यासाठी दोनशे-तीनशे टक्क्यांहूनही अधिक कालावधी लागतो. असा दावा व्यवस्थापकांचा आहे. थोडक्यात गेल्या काही वर्षात पगारांचे मान इंडियन एअरलाईन्समध्ये सातत्याने वाढत असताना कार्यक्षमता मात्र तितक्याच सातत्याने खालावत आहे. 'अलिकडे इंडियन एअरलाईन्सच्या

विमानांनी जाणं म्हणजे संकट वाटू लागले होते. विमान सुटेल का, सुटलेच तर वेळेवर सुटेल का आणि नंतरचा – प्रवास सुखरूप होईल का – विमान प्रवासापूर्वी प्रवाशांच्या मनात ह्या शंका घर करून राहातात ही वस्तुस्थिती आहे.' श्री. मनसुखलाल प्राणलाल ह्यांनी व्यक्त केलेली ही प्रतिक्रीया, इंडियन एअरलाईन्सच्या सध्याच्या परिस्थितीवर बराच प्रकाशझोत टाकणारी ठरावी.

'हीच परिस्थिती सुधारण्याचा आमचा प्रयत्न आहे. त्या दृष्टीने टाकलेले हे पहिले पाऊल आहे. कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या भरपूर पगारांच्या बदल्यात इंडियन एअरलाईन्समधला कारभार सुधारण्यासाठी सहकार्य मिळावे एवढीच व्यवस्थापकांची अपेक्षा आहे. परंतु त्या ऐवजी, कर्मचारी संघटनांकडून अडवणूकीचेच धोरण बहुश: स्वीकारले जाते! आजची टाळेबंदी ही अशाच अडवणूकींची अपरिहार्य परिणती आहे.'

कर्मचाऱ्यांचे आणि त्यांच्या संघटनांचे दावे अर्थातच वेगळे आहेत. 'नव्या पाळीपद्धती अंमलात आणण्याला आमचा विरोध कधीच नव्हता व नाही. फक्त त्या कर्मचारी संघटनांच्या सल्लामसलतीतून, सहकार्यातून राबवल्या जाव्यात, संघटनांना विश्वासात घेऊन अंमलात आणल्या जाव्यात एवढीच आमची रास्त मागणी आहे. १२ नोव्हेंबरपासून कर्मचाऱ्यांवर लादलेली नवी पाळी पद्धती कर्मचाऱ्यांना विश्वासात न घेता अमलात आली आहे. अर्थातच तिचा सारासार विचार करून, ह्या पद्धतीमुळे कर्मचाऱ्यांना काही अडचणींना तोंड तर द्यावे लागणार नाही ना वगैरे संभाव्य परिणामांचा अभ्यास करण्याची आम्हाला संधीच मिळाली नाही मॅनेजमेंटच्या एकतर्फी निर्णयाला म्हणूनच आमचा विरोध आहे. गेल्या कित्येक वर्षांच्या संघटित झगड्यातून, राष्ट्रीय लवादांच्या निर्णयांतून हवाई-कर्मचाऱ्यांना काही हक्क आम्ही मिळवून दिले आहेत. खुद्द शासन अशा तऱ्हेच्या समझोत्यांना साक्षी आहे. असे मिळालेले हक्क सहजासहजी सोडून द्यायला आम्ही राजी नाही. आणि आमचे हे हक्क खच्ची करण्याचे मॅनेजमेंटचे नवे धोरण आहे. त्यामुळे आजचा हा झगडा कदाचित नव्यानं सुरू होणाऱ्या झगड्यांच्या मालिकेतला पहिला असावा!'

दादर पोर्तुगीज चर्चजवळ एका घरी श्री. पंडित ह्या ओळखीच्या गृहस्थांकडे एका संध्याकाळी गप्पा चालल्या होत्या. गप्पांच्या ओघात विषय इंडियन एअरलाईन्स, तेलकंपन्या वगैरे ठिकाणच्या कर्मचाऱ्यांकडे वळल्या. एअर इंडियाचे एक वरिष्ठ अधिकारीही उपस्थित होते. '...Money is not the only criterion! ह्या विमान कंपन्या, मोठाल्या रिफाईनरीज ह्यातून मोठाले पगार कर्मचाऱ्यांना असतात. पण त्याचा अर्थ ते सुखी असतातच असे नाही. उलटपक्षी मोठाले पगार, गाडी, पॉश ब्लॉक्स ह्यामुळे घरी पत्नी, मुले, आजुबाजूचा परिवार-समाज ह्यात एक खास 'स्टेटस' त्या त्या व्यक्तीला प्राप्त

झालेली असते. सकाळी ऑफिसात जाताना त्या ‘ स्टेटस ’च्या सुखद उबेत तो असतो. त्या सुखद भावविश्वात असतानाच त्याला ऑफीसमध्ये ‘ वँगिंग ’ मिळतं, तेही शेलक्या शब्दात, इतरां-समोर, कुठल्याही खास कारणाशिवाय! अर्थातच त्याची पोझिशन चमत्कारिक होते. काही अंशी तो इथेच ‘ फ्रस्ट्रेट ’ होतो. त्याच्या ह्या ‘ फ्रस्ट्रेशन ’मधूनच नवा क्लॅश उभा राहतो...अशा ‘ फ्रस्ट्रे-शन ’मधून राजिनामे देऊन बाहेर पड-लेले व इतरत्र कमी पगारावर नोकऱ्या स्वीकालेले कितीतरी लोक मी तुम्हाला दाखवून देईन...So the salary they get is not the only important factor. The treatment meted out to them is also equally important ! ’

इंडियन एअरलाईन्सच्या कॉलनींतून हिंडताना तिथल्या लोकांतही ह्या नैराश्याची जाणीव मला मोठ्या प्रमाणावर आढळून आली. एका ग्राऊंड इंजिनियरने मला सांगितलं, ‘ वास्तविक ‘ युनियन्स ’च्या मागे लागणं इंजिनियर्स, टेक्निशियन्स वगैरे लोकांना पेलण्या-सारखंच नाही. पण तरीही संघटना बांधून, इतर कर्मचाऱ्यांच्या खांद्याला खांदा लावून आम्ही मॅनेजमेंटविरुद्ध उभे ठाकतो त्यालाही कारणं आहेत. Without union our position in the organisation is very unsafe ! ’

मानसिक त्रासाच्याही (Psycho-logical harassment) अनेक तक्रारीही मला अनेक तंत्रज्ञांनी ऐकवल्या... ‘ फायरींग ’, ‘ टॉर्चर्स ’ ह्यांनाही काही मर्यादा असतात हे मॅनेजमेंट विसरते. युनियन स्थापनेनंतर हे प्रकार काही प्रमाणात तरी निश्चितच कमी होतात... ’

कार्यक्षमता कमी होत जाते आहे हे काही कर्मचाऱ्यांनी कबूल केले, पण त्याची जबाबदारी कर्मचारी संघटनांवर टाकली जाते हे मात्र त्यांना खटकते... ‘ कर्मचारी कार्यक्षम नाहीत किंवा ते कामचोर आहेत असेही नाही. इथल्या सावळ्या गोंधळाची बव्हंशी जिम्मेदारी चुकीच्या व्यवस्थापकीय धोरणात, निर्णयात आहे. धरसोडीच्या निर्णयात आहे एक साधं उदाहरण द्यायचं तर अॅव्हरो खरेदीचं देता येईल. पायलट्-सच्या, तज्ज्ञांच्या विरोधात जाऊन व्यवस्थापकांनी, शासनाने अॅव्हरोंची खरेदी केली. सध्याचे चेअरमन पी. सी. लाल. ह्यांनी ते ह्या पदावर विराज-मान होण्यापूर्वी अॅव्हरो खरेदीला विरोध दर्शवला होता...अशाच अनेक चुकीच्या निर्णयामुळे एअरलाईन्सची कार्यक्षमता ढळली आहे, कर्मचाऱ्यांच्या अकार्य क्षमतेमुळे नाही ! ...’ अशा अनेक तक्रारी असल्यातरी, सध्याच्या ताज्या संघर्षाचे कारण मात्र ओव्हर टाईम कमी होतो ह्यात आहे. ओव्हरटाईम कमी होणार हे व्यवस्थापकही नाकारीत नाही. किंबहुना त्यासाठी व क्षमता सुधारण्यासाठीच हे पाऊल उचललं हेही ते स्पष्ट करतात. तेव्हा कर्मचाऱ्यांची काही साचलेली गाऱ्हाणी असली व

त्यात काही तथ्य असलं तरी सध्याच्या झगड्यात संपाचे उचललेलं पाऊल समर्थनीय होते का हा प्रश्नच आहे.

अर्थात टाळी कधीही एका हातानी वाजत नाही हेही खरंच. कदाचित संपाची हाक समर्थनीय नसेलही, पण त्याच प्रमाणात तडकाफडकी टाळेबंदीची नोटीसही पूर्णपणे समर्थनीय होती का हाही प्रश्नच आहे. मार्ग पूर्णपणे खुंटले होते अशी अवस्था दोन्ही बाजूंनी नव्हती असे मला वाटते. कर्मचाऱ्यांइतकेच व्यवस्थापकही इंडियन एअरलाईन्समधल्या आजच्या परिस्थितीला जबाबदार आहेत. कर्मचाऱ्यांच्या मूलभूत गाऱ्हाण्यांपर्यंत ते पोचले आहेत असे वाटत नाही. व्यवस्थापक म्हणजे कुणीतरी मोठे, आपल्याला आपले हक्क नाकारणारे ही भावना जोपर्यंत व्यवस्थापक कर्मचाऱ्यांच्या मनातून दूर करण्यात यशस्वी होत नाहीत तोपर्यंत ह्या संघर्षाचे मूळ सापडणे कठीण आहे.

तेव्हा सध्याच्या परिस्थितीत निव्वळ परस्परांवर दोषारोप करण्यात अर्थ नाही. परस्परांपुढे प्रश्न आहेत ते परस्परांनी एकमेकाकडे मांडले पाहिजेत. परस्पर सहकार्यातून मार्ग शोधून काढले पाहिजेत. निव्वळ कर्मचारी फार अडेलतट्टू बनले आहेत, त्यांची मिरास संपवली पाहिजे, सर्व जुने करार-मदार केराच्या टोपलीत भिरकावून देऊन एअरलाईन्सच्या कारभारात सुरळीतपणा आणला पाहिजे असे म्हणून प्रश्न सुटणार नाहीत. कदाचित सर्व दडपणापुढे कर्मचारी काही काळ दबेलही, सारे सुरळीतपणे चालल्यासारखे वाटेलही. पण आतल्याआत धुमसत असणारा असंतोष मात्र त्यामुळे संपुष्टात येणार नाही. तो आज नाही उद्या पुन: उफाळून वर येईलच. नव्या झगड्याला पुन: तोंड फुटेल. म्हणून आज आवश्यकता आहे ती हा असंतोष शमवायची ! ठाम भूमिकेच्या नावावर निष्कारण ताठरता व्यवस्थापकांनी टाळावी ही जशी अपेक्षा तशीच, थातूर-मातूर करारांच्या मलमपट्ट्यांनी उपाय शोधून काढू नयेत हीही अपेक्षा आहे. कर्मचाऱ्यांच्या प्रतिनिधींनी देखील व्यवस्थापकांची भूमिका समजावून घ्यायचा प्रयत्न केला पाहिजे ! अशा परस्पर सामंजस्यातून कायम स्वरूपाची उत्तरे एअरलाईन्समधल्या प्रश्नांना शोधली गेली, तरच शासनाच्या मालकीचा हा मक्तेदारी उद्योग भारताची शान खऱ्या अर्थाने ठरू शकेल. नाही तर आहेच सध्याचा रामभरोसे कारभार मागील अंकावरून पुढे चालू ! ● ● ●

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**

MANOOS (Weekly) : 50 Paise : Regd. No. MH 649

लवकरच
प्रकाशित
होत
आहे

**शतपावली**
**शतपावली**
**शतपावली**

रवींद्र पिंगे

राजहंस प्रकाशन